# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १२/०८/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा आज दि. १२/०८/२००५ रोजी शुक्रवार सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०५ दि. ०४/०८/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | उप-सभापती,महिला बालकल्याण |
| ८) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ९) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | सदस्य |
| १०) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| ११) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| १२) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १३) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १४) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १५) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १६) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १७) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १८) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १९) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| २०) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| २१) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २२) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २३) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २४) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २५) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २६) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २७) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| २८) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | सदस्य |
| २९) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ३०) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| ३१) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३२) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३३) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ३४) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३५) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३६) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३७) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३८) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३९) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ४०) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ४१) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ४२) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ४३) | श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत | सदस्या |
| ४४) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४५) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४६) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ४७) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४८) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४९) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ५०) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | सदस्या |
| ५१) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५२) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५३) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ५४) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५५) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५६) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५७) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५८) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ५९) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ६०) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ६१) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ६२) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ६३) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६४) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६५) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६६) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ६७) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ६८) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६९) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ७०) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ७१) | श्री. म्हात्रे तुळशीदास दत्तू | सदस्य |
| ७२) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ७३) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ७४) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ७५) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ७६) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७८) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ७९) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ८०) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| २) | सौ. गोहिल शानु | सदस्या |
| ३) | सौ. पाटील भानु भगवान | सदस्या |

## रजेचा अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |

वरिल प्रमाणे महासभेकरीता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

महापालिकेच्या सभागृहात सभेकरिता उपस्थित असलेले मा. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती साहेब, मा. उपायुक्त श्री. अशोककुमार रणखांब साहेब, स्थायी समिती सभापती श्री. मोहन पाटील साहेब, सभागृह नेते श्री. लिओ कोलासो साहेब, विरोधी पक्ष नेते श्री. परशुराम पाटील साहेब, सर्व पक्षांचे गटनेते, महिला व बालकल्याण समिती सभापती श्रीम. सुरेखा गायकवाड, सर्व प्रभाग समितीचे अध्यक्ष, सर्व नगरसेवक, नगरसेविका, महापालिका सचिव श्री. हरेश पाटील, सर्व अधिकारी आणि वृत्तपत्राचे प्रतिनिधी, प्रेक्षक गॅलरीत असलेले नागरिक बंधु-भगिनींनो.

मिरा भाईंदर महापालिकेचे कार्यतत्पर आयुक्त श्री. आर. डी. शिंदे साहेब यांची कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आयुक्त म्हणून बदली झालेली आहे. परंतु त्यांच्या चांगल्या कार्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आयुक्त पदाची कमान सांभाळणारे मा. आयुक्त श्री. सुदाम गायकवाड यांचे अभिनंदन करुन शहराच्या विकास कामांना चांगले सहकार्य लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करते.

जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुरु झालेल्या महाप्रलयंकारी पावसाने संपूर्ण महाराष्ट्रात थैमान घातले. विशेष म्हणजे रायगड आणि ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी झाली. पुरपरिस्थिती निर्माण झाली. यात अनेक निष्पाप जीवांचे बळी गेले. कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले. त्यात मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राला फटका बसून जिवित आणि वित्तहानी झाली. परंतु आपल्या मनपा क्षेत्रालगत असलेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, अंबरनाथ, बदलापूर, कुळगांव नगरपरिषद आणि भिवंडी महानगरपालिका क्षेत्रांना ज्या फार मोठ्या प्रमाणात जिवित आणि वित्तहानी झाली त्या ठिकाणचे चित्र पाहता अत्यंत विधारक असे आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका आरोग्य विभागातील कर्तव्यदक्ष अधिकारी यांनी पावसाळ्याच्या अगोदर नियोजनबध्दरितीने या शहरातील गटारे आणि नाले अत्यंत चोख रितीने आमच्या अध्यक्षतेखाली साफसफाई केल्याने पावसाचे पाणी शहरात न तुंबता गटारातुन, नाल्यातुन वाहून समुद्रात मिळाले आणि पुर परिस्थिती ही तेवढ्या मोठ्या प्रमाणात उद्‌भवली नाही. परंतु सखल भाग व डोंगरावरुन उतरणा-या पाण्याचा प्रवाह फार मोठ्या प्रमाणावर असल्याने भाईंदर पूर्वेकडील काही भागात आणि हायवेलगतच्या क्षेत्रात पाणी साचले व त्यामुळे जिवितहानी आणि वित्तहानी झाली. या पुरग्रस्तांच्या सर्वेक्षणाचे काम मिरा भाईंदर महापालिकेतील कर्तव्यदक्ष मा. आयुक्त श्री. आर. डी. शिंदे साहेब तसेच सर्व उपायुक्त, वॉर्ड ऑफीसर पुर परिस्थितीवर लक्ष ठेउन संपूर्ण परिसरात दक्ष राहून कमर्चारी वर्ग पावसा, पाण्याची तमा न बाळगता संपूर्ण महानगरपालिकेच्या क्षेत्रातील आपदग्रस्तांच्या घरोघरी जाउन अथक परिश्रमांने माहिती घेउन, पंचनामे करुन महसुल खात्याच्या अधिका-यांना अमुल्य सहकार्य करीत आहेत. महसुल खात्याचे अधिकारी, सर्व तलाठी, सर्कल ऑफीसर, तहसिलदार, प्रांत अधिकारी आणि मा. जिल्हाधिकारी त्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. आणि त्यामुळे सर्वांना वेळेवर मदत पोहचत आहे. विशेष म्हणजे पुरपरिस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेचा पाणी पुरवठा हा विस्कळीत झालेला होता परंतु महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता श्री. बारकुंड साहेब यांनी अथक परिश्रम घेउन त्यांनी दोन दिवसांच्या आंत हा पाणीपुरवठा सुरळीत करुन आपल्या नागरिकांची तहान भागवलेली आहे. व त्यांची त्यांची गैरसोय होउ नये म्हणून त्यांनी फार मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतलेले आहेत. त्यांचेसुध्दा येथे मी त्यांनाही धन्यवाद देउ ईच्छिते. सर्व यंत्रणेला धन्यवाद देत असतानांच मिरा भाईंदर क्षेत्रातील सर्व नागरिक, बंधु-भगिनी यांनी ज्या धिरोत्तरपणे या बाका प्रसंगास तोंड देउन आपल्या लढाउ वृत्तीने व इतर आपदग्रस्त बांधवांना मदत करण्याची चांगली वृत्तीची दाद देउन त्यांनी मिरा भाईंदर महापालिकेचे सर्व अधिकारी, पदाधिकारी पुर परिस्थिती हाताळण्यास मला जे मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देते.

महानगरपालिका क्षेत्रातील एकुण १०,५४५ कुटूंबे पिडीत झाली असून त्यापैकी २,०३५ पंचनामे झालेले आहेत व उर्वरीत पंचनामे करण्याचे काम चालु आहे. आणि ते लवकरच पूर्ण होतील. पंचनामे पूर्ण झाल्यापैकी १,६१४ बाधीत कुटूंबांना एकूण रु. ४० लाख रुपयाची मदत वाटप झालेले आहे. या प्रलयात मनपा क्षेत्रातील एकूण नउ व्यक्ती मृत झालेल्या असून त्यापैकी तीन व्यक्तींच्या कुटूंबांना प्रत्येकी १ लाख रुपयांची मदत दिली गेली आहे. व पुढील कार्यवाहीचे योग्य निर्देश दिलेले आहेत. त्यादृष्टीने सर्व कामकाज चालु आहे. दि. २८/८/२००५ ते दि. ०८/९/२००५ या कालावधीत आय. एच.एस. इंडिया नवी दिल्ली या संस्थेने ऑस्ट्रेलिया आणि न्युझीलंड या देशात इन्व्हाइटिंग प्रोग्राम कोर्स आयोजित केलेला आहे. वरिल कालावधीत विशेष दौ-यात उपस्थित राहण्याकरिता महाराष्ट्र राज्याने मा. मुख्यमंत्र्यांनी परवानगी मिळणे जरुरीचे असल्याने आपल्या या महासभेने ठराव करताच प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे सादर केला होता. आणि महाराष्ट्र शासनाचे पावसाळी अधिवेशन सुरु असतानादेखील प्राधान्याने विदेश दौ-यासाठी शासनाने मंजूरी मिळवून दिली होती. परंतु या. महाप्रलयंकारी महापुरात मनपा हद्दीत माझे लाखो बंधु-भगिनी यांना पूर परिस्थितीला सामोरे जात असताना व या बिकट परिस्थितीत अडकले असताना, करोडो रुपयांच्या मालमत्तेची हानी झाली असताना विदेश दौ-

यासाठी जाणे माझ्या मनास पटत नसल्याने मी दि. ०५/८/२००५ रोजी मा. आयुक्त साहेबांना पत्राने दौ-यास जात नसल्याबाबत कळविलेले आहे. व या दौ-यास होणा-या खर्चाची रक्कम रु. साडे -तीन लाख मा. आयुक्त साहेब यांच्याकडे परत केलेली आहे. प्रलयकारी परिस्थितीत मला प्रशासनाने जे सहकार्य केले आणि धिरोत्तरपणे आलेल्या प्रसंगास तोंड दिले त्याबद्दल प्रशासनाचे, अधिका-यांचे, पदाधिका-यांचे, पत्रकार बंधुंचे आणि माझ्या सर्व तमाम नगरवासियांचे धन्यवाद व्यक्त करते व अशाप्रकारची परिस्थिती पुन्हा घडू नये व असे असायी संकट पुन्हा येउ नये, अशा असायी संकटात अडकलेल्या व बाधीत बांधवांना नवी उभारी मिळावी हीच ईश्वरचरणी प्राथर्ना करते.

तसेच सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षात एस. एस. सी. आणि एच. एस. सी. या निकालात ज्या विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळाले आहेत. त्यापैकी काही गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार या महासभेत आम्ही करण्याचे आयोजिले आहे. तरी सत्कारमुर्ती विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात तसेच उत्तरोत्तर सुयश मिळो असे शुभ चिंतते. धन्यवाद. जयहिंद! आपण प्रथम विद्यार्थ्यांचा सत्कार करुया नंतर सर्व सन्मा. सदस्यांना बोलण्याची संधी मिळेल.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की हे चुकीचे आहे. आपण आता जो पत्रव्यवहार वाचून काढलेला आहे. त्याच्यामध्ये कुठेतरी दिशाभुल झाल्याचे मला वाटते असे मी विरोधी पक्ष नेता म्हणून म्हणतो आहे. आता २६ तारखेला पूर आलेला होता. त्याच्यामध्ये काही लोकांना डेंग्यु, मलेरीया तापाची साथ आलेली आहे. त्याच्यामध्ये किती लोक आपल्या मिरा भाईंदरमध्ये प्रायव्हेट हॉस्पीटलमध्ये दाखल झाले आहेत. त्यासाठी डॉ. बावसकर आणि इतर दुसरे अधिकारी यांनी त्यांची किती पाहणी केली, किती लोकांचा मृत्यु झाला, किती लोकांना डेंग्यु आणि मलेरीयाचा ताप आहे. याची मला संपूर्ण माहिती द्या. ही माहिती सभागृहामध्ये दिल्याशिवाय सभागृह चालु करु नये असे माझे म्हणने आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, सन्मा. विरोधी पक्षनेते श्री. परशुराम पाटील यांनी महापौरांच्या प्रास्ताविकाच्या भाषणाला जसा काही आक्षेप घेतलेला दिसत आहे असे वाटते. मा. महापौरांनी त्याच्या भाषनाच्या शेवटच्या उता-यामध्ये या सभागृहामध्ये या शहरातील जे गुणवंत विद्यार्थी आहेत त्यांचा जाहिर सत्कार करण्याचा प्रस्ताव आपल्याकडे ठेवलेला आहे. मी मा. विरोधी पक्षनेत्याच्या भावनेशी सहमत असतानासुध्दा मी त्यांना विनंती करेन की आपल्याला अनंत वेळ आहे. आणि आपण बराच वेळ सभागृह चालवणार आहोत. कदाचीत हे सभागृह संध्याकाळी ७ वाजेपर्यंत चालेल. आमचीसुध्दा त्याला तयारी आहे. परंतु त्यापूर्वी आपण ह्या विद्यार्थ्यांचा सत्कार करुन त्यांना आपण मोकळे केले तर बरे होईल.

**परशुराम पाटील :-**

साहेब, आपल्याला विनंती आहे की अगोदर सत्कार असावा. की जे लोक मृत्युच्या छायेत आहेत त्यांचा जीव वाचवावा. अहो आपण सत्कार नंतरसुध्दा करु शकतो. हे आपले चुकीचे आहे. ते विद्यार्थी या ठिकाणी आलेले आहेत. परंतु डॉक्टरांनी थोडीशी माहिती द्यावी की किती लोक आजारी आहेत व किती लोकांचा मृत्यु झालेला आहे. त्याची माहिती द्यावी. तुम्ही डायसवरुन माहिती दिली तरी चालेल.

**मिलन म्हात्रे :-**

प्रथम विद्यार्थ्यांचा सत्कार होउ द्या. आमचे त्याला समर्थन आहे. सर्व सन्मा. सदस्यांनी या सत्कारासाठी उभे रहावे. सत्काराचा कार्यक्रम अगोदर उरकून घ्या.

**परशुराम पाटील :-**

हा महत्वाचा प्रश्न आहे. एखादा माणूस मरतो आणि आपण त्या माणसावर फुले टाकतो. त्यावेळेला तो माणूस बघायला येतो का? हे चुकीचे आहे.

**रोहीत सुवर्णा :-**

ते विद्यार्थी देशाचे भविष्य आहेत. त्यांचा सत्कार व्हायला पाहिजे. तरी त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम उरकून घ्या.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, प्रथम विद्यार्थांचा सत्कार करुन घ्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, यहॉपर पालक और विद्यार्थी बैठे हुए है। उनका सत्कार करके उनको पहले जाने दिजिए।

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आपल्या शहरातील दहावी आणि बारावीतील जे विद्यार्थी चांगल्या मार्काने उत्तीर्ण झालेले आहेत त्यांचा सत्कार मा. महापौरांच्या हस्ते याठिकाणी आयोजित करण्यांत आलेला आहे. तरी आपण प्रथम सत्कार करुन नंतर प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करण्यांत येईल. ज्या विद्यार्थांचा सत्कार करायचा आहे. त्या विद्यार्थ्यांची नावे मी पुकारतो आहे.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौरांच्या निवेदनावर चर्चा होईल आणि नंतर सत्कार होईल.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आपण आपल्या मिरा भाईंदर शहरातील या विद्यार्थी वर्गांना त्यांच्या शैक्षणिक कायार्ची गुणवत्ता दाखवलेली आहे. त्याच्याबद्दल सत्कार करण्यासाठी या ठिकाणी बोलावले आहे. मला आनंद होत आहे की या सत्काराच्या सोबतच त्यांचे सन्मा. पालकसुध्दा या सभागृहात आहेत. या मिरा भाईंदर शहरातील सुमारे ५ लाख २० हजार लोकवस्तीच्या नेतृत्व करित आहे या शहरात अनेक नावाजलेल्या शैक्षणिक संस्था, अनेक नावाजलेले कॉलेजेस आहेत. त्या कॉलेजचे प्रवर्तक, संस्थापक आणि शिक्षक, कार्यकर्ते हे सर्व या शैक्षणिक कार्यात चांगले योगदान देत आहेत. त्यामुळे मिरा भाईंदर शहराचा शैक्षणिक दर्जा उत्तरोत्तर वाढत आहे. या शहराचे साक्षरतेचे प्रमाण उपलब्ध माहितीनुसार मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण दर्जाच्या तुलनेने समतुल्य आहे. आणि हे दिवसेंदिवस वाढायला पाहीजे. म्हणून हे जे विद्यार्थी मा. महापौर मॅडम मला ह्या विद्यार्थी वर्गाची नांवे आम्हाला ॲडवान्समध्ये मिळाली असती तर त्यांचा व्यक्तीगत उल्लेखसुध्दा आम्हाला करता आला असता. आणि त्यांची गुणवत्तासुध्दा आम्हाला या सभागृहात वाचून दाखवून किंवा सांगुन विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करता आले असते. ठिक आहे. ते जरी आमच्याकडे नसले तरी हे जे विद्यार्थी ओळीने उभे आहेत हे विद्यार्थी या शैक्षणिक कार्यात अग्रेसर आहेत. या शहराचा हा मान आहे. असे मी या सभागृहातर्फे व्यक्त करतो आणि हे जे सगळे विद्यार्थी त्यांच्या भावी आयुष्यात उत्तरोत्तर अधिक प्रगतीने पुढे जाउन अधिक गुणवंत आणि यशवंत होवोत अशी मी सभागृहाच्यावतीने शुभेच्छा व्यक्त करतो.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम एकतर थोडीशी माहिती द्या की मला वाटते मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये बरेचसे विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले असतील तरी आपण त्यांना या ठिकाणी बोलाविलेले आहे ते कोणते ते कोणते दहा-विस असतील तरी त्यांना आपण काय निकष लावलेला आहे? गुणवत्तेनुसार किंवा टक्केवारीनुसार ते कोणत्या पध्दतीने केले आहे? दुसरी गोष्ट मला सांगा पालक आणि विद्यार्थी किंवा येथे विद्यार्थी आणि शिक्षकसुध्दा असु शकतात. तरी कृपया त्यांना दोन मिनिटे बसण्याची व्यवस्था करावी. विद्यार्थ्यांबरोबर पालकसुध्दा आहेत.

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, या ठिकाणी निकष हा गुणवत्तेनुसार लावलेला आहे. शहरातील पहिली दहा विद्यार्थी आहेत. कुमारी सनाह बेगम शाहजन ही शांतीनगर हायस्कूलची विद्यार्थी असून तीने ९०.६०% गुण मिळाले असून ती दहावीची विद्यार्थीनी आहे.

**सुरेखा गायकवाड :-**

या ठिकाणी विद्यार्थ्यांबरोबर शिक्षक आले असतील तर शिक्षकांनीसुध्दा स्टेजवर येणे आवश्यक आहे.

**प्र. सचिव :-**

नायर वीणा विश्वनाथन, निरंजनलाल दालमिया ९१.०६%, तिचे पालक असतील तर त्यांनीसुध्दा स्टेजवर सत्कारासाठी यायचे आहे. निशा नारायण सरवणकर शांतीनगर हायस्कूल ९०.८०%, शेट्टी अभिनया, हॉली क्रॉस कॉन्व्हेन्ट स्कुल ८९.८६% मिरा रोड, मालपानी नरेन्द्र कुमार सेन्ट फ्रान्सीस हायस्कुल ८९.७३%, भाईंदरची शाळा आहे. बलविर सागर सेन्ट फ्रान्सीस हायस्कूल ८९.६०%, जुम्बरसेन सेन्ट फ्रान्सीस हायस्कुल ८९.०६% आयर्न अरविंद हॉलीक्रॉस कॉन्व्हेन्ट स्कूल ८८.९३% मसलिया निरज पंकज, जे.एच.पोद्दार हायस्कूल ८८.४०% या शाळेचे ट्रस्टी सन्मा. सदस्य शशिकांत शहा हे आहेत. मी आता इयत्ता बारावीची वेगळी नावे घेतो. या ठिकाणी मी विद्यार्थ्याचे नाव वाचतो देसाई निरज डिवाईन इमेज विज्ञान विभाग, आंग्रे सुशील राजेंद्र अभिनव विद्यामंदीर भाईंदर (पू.) या शाळेचे ट्रस्टीसुध्दा येथे उपस्थित आहेत सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील हे आहेत. पटेल अस्मिता अर्जुन अभिनव विद्यामंदीर भाईंदर (पू.) ही अभिनव विद्यामंदीरची विज्ञान शाखेची स्टूडन्ट आहे. या शाळेचे अध्यक्ष सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील हेसुध्दा हजर आहेत. वाणिज्य विभाग त्रिपाठी शाहू राकेश हा शंकर नारायण कला वाणिज्य कॉलेजच्या वाणिज्य विभागाचा विद्यार्थी असून या कॉलेजचे संस्थापक श्री. रोहीदास शंकर पाटील हे हजर आहेत. दोषी मनाली धरेंद्र सेन्ट ॲन ज्युनियर कॉलेज, रिना मेहता ह्यासुध्दा माजी नगरसेविका आहेत. नाईक नितिन नारायण हा शंकर नारायण कला वाणिज्य महाविद्यालयाची विद्यार्थी आहे. चतुर्वेदी निलम हेमंतकुमार महाभारती ज्युनियर कॉलेज कला विभाग ७५% हा कला विभागाचा विद्यार्थी आहे. पवार श्रीकांत रामचंद्र अभिनव विद्यामंदिर भाईंदर यांचे कार्याध्यक्ष सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील हे आहेत. आणि याचे उपाध्यक्ष सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे हेदेखील या सभागृहात हजर आहेत. राजगुरु स्वाती वसंत अभिनव विद्यामंदिर भाईंदर. सत्कार समारंभाचा कार्यक्रम संपला असून कृपया सर्वांनी आपआपल्या जागेवर बसायचे आहे.

**रिटा शाह :**

आज आपण या ठिकाणी सत्कार केलेला आहे. तरी शान्ती नगर शाळा, सेन्ट फ्रान्सीस, अभिनव शाळा, जे. एच. पोद्दार हायस्कुल आणि एस.एन. कॉलेज या संस्थापकांचेसुध्दा मी धन्यवाद अदा करते. मा. महापौर मॅडम, आपण आता महापौर निधी तयार करणार आहोत. मिरा भाईंदर महापालिकेमध्ये तर माझी आपल्याला एक सुचना आहे की असे जे विद्यार्थी एवढा चांगला गुणांक घेउन पास होतात. आपण त्यांना ट्रॉफी द्यायची आणि त्यांचा सत्कार करायचा त्याच्यापेक्षाही जास्त आपण त्यांना फायनान्शिअली बाय चेकने आणि बाय लिगली मदत करु शकणार असे काहीतरी महापौर निधीमध्ये आपण इन्क्ल्यूड करावे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्याला एक मुद्दा उपस्थित केलेला होता की डॉ. बावसकर साहेबांनी सभागृहाला माहिती द्यावी कारण हा संपूर्णपणे नगरसेवक आणि नगरसेविका यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. म्हणून जरा त्यांनी माहिती द्यावी. डॉ. बावसकर साहेब कुठल्या हॉस्पीटलमध्ये आपले किती लोक आजारी आहेत आणि त्याच्यामध्ये किती लोकांचा मृत्यु झालेला आहे. आणि त्यांना कोणत्या पध्दतीचा उपचार चालु आहे ते जरा सभागृहाला सांगा.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी जो सत्काराचा कार्यक्रम झाला प्र. सचिवांनी वाचताना १० वी चे विद्यार्थी वाचले आपण १० वी बरोबर १२ वी च्या विद्यार्थ्यांची नांवे घेतली तर त्यात १० वी चे किती विद्यार्थी होते?

**प्र. सचिव :-**

१० वी चे दहा विद्यार्थी होते.

**प्रकाश दुबोले :-**

यामध्ये १० वी च्या विद्यार्थ्यांच्या जो सत्कार झाला त्याच्यामध्ये शेवटच्या विद्यार्थ्यांची टक्केवारी काय होती?

**प्र. सचिव :-**

विद्यार्थ्याचे नांव आयर्न अरविंद असे असून ८८.९३% गुण मिळाले आहेत.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, मी ह्या ठिकाणी नमुद करतो की या ठिकाणी मिरा भाईंदरची जी यादी बनविली गेली ती संपूर्ण मिरा भाईंदर शहरामध्ये ९० टक्केच्यावर विद्यार्थी आहेत. तरी तो त्यांच्यावर अन्याय झालेला आहे असे मी या ठिकाणी नमुद करतो. भाईंदर सेकंडरी स्कुलचा स्वरुपसागर कुलकर्णी हा ९० टक्क्यावरचा विद्यार्थी होता. त्याला या ठिकाणी निमंत्रित केलेले नाही. त्याचप्रमाणे बिशप हायस्कुलचा पंकज जितेंद्र जैन यालाही ९० टक्केच्यावर गुण असताना त्या विद्यार्थ्याला या ठिकाणी बोलावलेले नाही. या याद्या कोणी तयार केल्या? ह्याच्यामध्ये असा भेदभाव का करण्यात आला?

**जेन्वी अल्मेडा :-**

मा. महापौर मॅडम, नाझारेथ स्कुलचेसुध्दा विद्यार्थी आहे. त्याचे नांवसुध्दा आलेले नाही. व त्यांनादेखील या ठिकाणी बोलविण्यात आलेले नाही.

**प्रकाश दुबोले :-**

दहावीचे विद्यार्थी बोलवायचे होते तर ह्या मिरा भाईंदर शहरामध्ये जास्तीत जास्त मेरिटचे विद्यार्थी होते. त्या दहावीच्या विद्यार्थ्यांना येथे बोलवायचे होते.

**जेन्वी अल्मेडा :-**

रिझल्ट नाझरेथ स्कुलचा चांगला लागलेला असून काही चांगल्या टक्केवारीने पास झालेले विद्यार्थी होते. तरी यात एकही नाझारेथ स्कुलचा विद्यार्थी आलेला नाही.

**आसिफ शेख :-**

या याद्या कोणी बनविल्या?

**परशुराम पाटील :-**

एवढी घाई करायला नको होती. संपूर्ण शाळांची शहानिशा करुन आपण या ठिकाणी सत्कार समारंभ घ्यायला पाहीजे होता.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, ही यादी कोणी तयार केली? त्याची माहिती घ्यावी आणि आपण संबंधितांवर काय कार्यवाही करणार आहात का? चुकीची यादी जर तयार केली असेल तर त्यांच्यावर काय कार्यवाही करणार?

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, शिक्षण क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळविले म्हणून तुम्ही सभागृहात मानसन्मान करताना हे नेहमीचे झाले आहे. एखादा विषय तुम्ही ज्यावेळेला महासभेमध्ये घेता तरी त्या विषयाची संपूर्ण माहिती मिळवून मगच तो विषय येतो. आपण एका बाजूला त्या विद्यार्थ्यांचा कुठेतरी मानसन्मान केला . आणि दुसऱ्या बाजूला इतर विद्यार्थ्यांवर कुठेतरी अन्याय केल्यासारखी घटना घडली आहे. तरी ज्या अधिका-यांनी हे

काम केलेले आहे त्याची सविस्तर माहिती मागवा. कारण हा विषय परत-परत महासभेच्या हयाच्यावर बरीच चर्चा घडलेली आहे.

**परशुराम पाटील :-**

जे आता राहिलेले विद्यार्थी आहेत त्यांचा परत सत्कार करण्यांत येईल का? जे राहिलेले विद्यार्थी ज्यांची टक्केवारी जास्त आहे. त्यांचा सत्कार करण्यांत येईल का?

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम ह्याच्यामध्ये तुमची, आमची, सगळयांची दिशाभुल केलेली आहे. संपूर्ण सभागृहाची दिशाभुल केलेली आहे. त्याच्यामुळे ह्या विषयावर संपूर्ण चौकशी होउन संबंधितांवर कार्यवाही करायला पाहीजे.

**मा. महापौर :-**

ज्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार बाकी राहिलेला आहे त्या विद्यार्थ्यांचा सत्कार महापौर दालनामध्ये बोलावून त्यांचा सत्कार केला जाईल.

**प्रकाश दुबोले :-**

सत्कार बाकी राहीलेला आहे असे नाही. ज्या अधिका-यांनी चुकीची माहिती दिलेली आहे.

**मा. महापौर :-**

ती माहिती काढून घेउन त्यांना बोलावून त्यांचा सत्कार केला जाईल.

**प्रकाश दुबोले :-**

विद्यार्थ्यांचा सत्कार करणे हे ठिक आहे परंतु सभागृहामध्ये सत्कार करणे आणि दालनामध्ये सत्कार करणे ह्याच्यामध्ये फरक आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

अधिका-यांना काय आहे?

**प्रकाश दुबोले :-**

हे जाणूनबुजूण केलेले आहे असे आमचे मत आहे. तरी आपण त्या अधिका-यावर कारवाई करा.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम त्या विद्यार्थ्यांचा आपल्या दालनामध्ये बोलावून सत्कार करुन हा विषय संपत नाही. त्या पर्टिक्युलर अधिका-यावर तुम्ही कायदेशीर कारवाई करा.

**प्रकाश दुबोले :-**

ज्या अधिका-याने चुकीची माहिती दिलेली आहे. त्याच्यावर कारवाई करा.

**प्रभात पाटील :-**

मी अगोदरच हा प्रश्न विचारला की तुम्ही काय निकष लावले, तेव्हा तुमच्या लक्षात आले पाहीजे होते की आपण काय निकष लावले. आपण सगळ्यांना न्याय देतो का? मिरा भाईंदर महानगरपालिका जर असे कुणाच्या पदरी झुकते माप देत असेल, विद्यार्थ्यांच्या बाबतीत असे होत असेल तर निश्चितपणे हे सहन केले जाणार नाही. या संबंधित अधिका-यावर कार्यवाही झालीच पाहीजे.

**गजानन भोईर :-**

मा. महापौर मॅडम आपण जी रोजनिशी बनविलेली होती. त्या रोजनिशीमध्ये जो स्मशानाचा उल्लेख केलेला होता तोसुध्दा बरोबर नव्हता. आता आपला जो आभ्यासवर्ग गेलेला होता. तेव्हा आपल्या महानगरपालिकेचे कुठलेही पुस्तक घेउन गेलेले नव्हते. आपला कुठलाही कार्यक्रम करताना त्याचे नियोजन हे बरोबर नसते. प्रत्येक ह्याच्यामध्ये धांदल असते. तसेच या विद्यार्थ्यांच्या बाबतीमध्ये झाले. रोजनिशी बनविली त्याच्यामध्येसुध्दा तसेच झाले. जसे आता सन्मा. सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ज्या अधिका-यांनी ती लिस्ट बनविली असेल त्या अधिका-यावर कारवाई करावी.

**आसिफ शेख :-**

ह्या सभागृहाची दिशाभुल केली जात आहे. ही गंभीर चुक आहे. त्यामुळे आपण हा विषय गंभीरतेने घ्या आणि संबंधितांवर कार्यवाही करण्याचे या ठिकाण रुलिंग द्या.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो की, ह्यापूढे त्याची टिपणी आणि प्रोसेडिंग मागवा.

**मा. महापौर :-**

आपली सुचना समजलेली आहे. आपण खाली बसावे. आपण जी ही यादी मागवली होती. ती पुर्णपणे शिक्षण विभागाकडून मागविलेली होती. आणि ह्या यादीमध्ये आपल्याला जी यादी मिळालेली होती त्यात संपूर्ण मिरा भाईंदरचा निकष पकडून जास्तीत जास्त हायेस्टची जी टक्केवारी होती त्या विद्यार्थ्यांचा आपण या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. दहावीचे १० विद्यार्थी आणि बारावीचे ९ विद्यार्थी असा या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. परंतु ज्या विद्यार्थ्यांचा या ठिकाणी कुठल्याही प्रकारचा उल्लेख नाही. आपण जी सुचना या ठिकाणी सांगितलेली आहे त्या सुचनेची योग्य प्रकारे नोंद घेतली जाईल. त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन ती यादी आपण पुन्हा मागवून आपण त्यांचा सत्कार करु या.

**परशुराम पाटील :-**

आता पुढच्या सभेत घेताना प्रोसेडिंग आणि टिपणी द्या. म्हणजे प्रोसीजर कायदेशीर राहील.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो आहे की राहीलेल्या विद्यार्थ्यांचा जो सत्कार आहे तो सत्कार आज जसा महासभेत सत्कार झाला त्याप्रमाणे झाला पाहीजे.

**मा. महापौर :-**

त्या विद्यार्थ्यांचा सत्कार महासभेत केला जाईल.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की मघाशी मा. महापौरांनी जे निवेदन केले की शहरात अत्यंत गंभीर परिस्थिती असताना आपले आयुक्त आपल्या महापालिकेचा चार्ज सोडून..........

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम मी माझा प्रश्न उपस्थित केला होता की मला डॉ. बावस्करांकडून माहिती हवी होती. तरी ती माहिती आता बाजूला चाललेली आहे. आणि आता सन्मा. सदस्य रोहीदास पाटील उभे राहीलेले आहेत. तरी माझे म्हणने आहे डॉ. बावस्कर साहेबांनी सभागृहाला माहिती द्यावी हा माझा महत्वाचा मुद्दा आहे.

**डॉ. बावस्कर :-**

मा. महापौर महोदया, दि. २६, दि. २७ आणि त्यानंतर झालेल्या अतिवृष्टीमुळे आणि महानगरपालिका क्षेत्रात काही विभागामध्ये पुर आणि साचलेले पाणी ह्याच्यामध्ये महानगरपालिका क्षेत्रामध्ये साथीचे आजार पसरण्याची शक्यता होती आणि ही शक्यता विचारात घेवून आपण महानगरपालिकेमध्ये उपाययोजना सुरु केलेली होती. त्यानुसार जे-जे झाले विभाग पुराने बाधीत झालेले होते. ज्या-ज्या विभागात पाणी साचले होते त्या-त्या विभागामध्ये आपण दररोजचे जवळजवळ आठ कॅम्प, वैद्यकिय अधिकारी आणि आपला स्टाफ वेगवेगळ्या ठिकाणी कॅम्प घेतात. यामध्ये आता महानगरपालिका क्षेत्रामध्ये खाजगी रुग्णालय आणि आपल्या डॉक्टरांनी बधितलेल्या रुग्णांची संख्या आणि त्या विषयाची माहिती मी आपल्याला खालीलप्रमाणे देत आहे. आतापर्यंत १ तारखेपासून १०,८१५ रुग्णांची तपासणी, नागरिकांची तपासणी कॅम्पमध्ये आणि दवाखान्यामध्ये केलेली आहे. याप्रत्येक १ तारखेपासून आतापर्यंत म्हणजे कालपर्यंत १०,८१५ जे औषधोपचारासाठी आले अशा रुग्णांची तपासणी केलेली आहे. त्याच्यामध्ये खाजगी आणि आपल्या रुग्णालयामध्ये तापाचे आजपर्यंतचे एकुण ७५६ रुग्ण आहेत. नंतर डायरियाचे म्हणजे आपण संडास, जुलाब होणे बोलतो त्याचे ४३६ पेशन्ट आहेत. गॅस्ट्रोचे ९ पेशन्ट आहेत. श्वासोंच्छवासाचे आजार म्हणजे इन्फेक्शन सर्दी, खोकला वगैरे ५१६ पेशन्ट आहेत. जखमा झालेले १४० पेशन्ट आहेत. सर्पदंशाचे ३ पेशन्ट आहेत. त्याचबरोबर जॉन्डीसचे म्हणजे काविळचे ३ पेशंट आहेत. लेप्टोस्पायरसिसचे २ संशयित आणि २ मृत्यु झालेले आहेत. एकाचा मृत्यु मिरा रोड विभागातील आहे आणि एक गोडदेव विभागातील असून त्याचे नांव संजय पाटील म्हणून आहे. तो मालाडच्या हॉस्पीटलमध्ये ॲडमिट होता. आज सकाळी संजय पाटील म्हणून नाकोडा हॉस्पीटलमध्ये गेला होता. नाकोडा हॉस्पीटलमध्ये डॉ. जैननी त्यांना मालाडच्या रुग्णालयात चार दिवसांपूर्वी रेफर केलेले होते. आणि आज त्याचा मृत्यु झालेला आहे. हे दोन संशयित लेप्टोस्पायरसीसचे पेशन्ट आहेत. यांची लेप्टोस्पायरसीसची टेस्ट जरी निगेटीव्ह असली तरी लेप्टोस्पायरसीसारख्या एक संशयित म्हणून त्यांना ट्रिट केलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब आमच्या तळावाजवळील बिल्डींग बाळकृष्ण ज्योत आहे. त्या बिल्डींगमध्ये एकाला असाच साथीचा आजार झालेला आहे.

**डॉ. बावस्कर :-**

सध्या तो पेशन्ट कुठे आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

तो तुंगा हॉस्पीटलमध्ये आहे.

**डॉ. बावस्कर :-**

तुंगा हॉस्पीटलमध्ये एक पेशन्ट आहे. आज मिरारोडला मोदी साहेबांच्या वॉर्डमधील एक पेशन्ट आहे. आपण ह्या अतिवृष्टीनंतर १ तारखेलाच भाईंदर मेडिकल असोसिएशन आणि मिरा रोड मेडिकल असोसिएशनच्या डॉक्टरना बोलावून त्यांची एक मिटींग घेतली आणि ह्यामध्ये त्यांच्याकडे असलेल्या रुग्णांची संख्या त्यांनी त्वरीत कळवावी. फोनवर माहिती दिली तरी आपले लोक त्या ठिकाणी जातात. आणि माहिती घेउन वेगवेगळ्या विभागामध्ये उपाययोजना करतात. त्यानंतर ९ तारखेला भक्ती वेदान्त हॉस्पीटलमध्ये आम्ही पुन्हा एकदा मिटींग घेतली आणि उद्या शनिवारी दुपारी १ ते ४ च्या वेळेमध्ये सर्व मिरा भाईंदर, मिरा रोड संपूर्ण प्रॅक्टीसना दोन्ही असोसिएशनना विनंती केली की मॅडम, ब-याच ठिकाणी काय होते की ब-याच जनरल प्रॅक्टेसरना त्यांच्याकडे पेशन्ट आल्यानंतर या रोगाची जी लक्षणे असतात ती ओळखता येत नाहीत आणि थोड्याश्या औषधोपचारामुळे जर लक्षणे ओळखली गेली नाही तर तसे मेडिकल असोसिएशनला, सर्वाना अगोदरच कळविले. परंतु उद्या सगळ्या प्रॅक्टिस नर्ससाठी १ ते ४ यांच्यासाठी खास ओरिएन्टेशन म्हणजेच

आपण छोटेसे प्रशिक्षण उद्या देणार आहोत यासाठी एक्सपर्ट आहेत, मी आहे आपण सगळ्यांनी उद्या कुठलाही रुग्ण या औषधापासून वंचित राहू नये. कारण यापैकी पहील्या रुग्णांचे जर आपण बधितले तर ते मुंबईच्या परळ विभागातुन आठ तास पाण्यामधुन पायी चालत आलेला होता. म्हणजेच बरेचसे ते आपल्या विभागातील असोत किंवा कुठल्याही विभागातील असोत परंतु ज्यांना ही बाधा झालेली असेल तर आपण जास्तीत जास्त त्या रुग्णापर्यंत पोहचत आहोत. आपला कॅम्प उद्याही चालु आहे. रविवारीसुध्दा चालु आहेत. दि. १५ ऑगस्टला कॅम्प चालु आहेत. १ तारखेपासून सुट्टी कोणालाही देण्यांत आली नाही. आपला प्रत्येक दवाखाना चालु आहे. कॅम्पसुध्दा चालु आहेत. ज्या-ज्या ठिकाणची माहिती मिळते त्या ठिकाणी आपण त्वरीत कॅम्प लावतो. सर्वांना जवळजवळ आपल्या सर्व नगरसेवकांनी प्रत्येक वेळेला माहिती दिलेली आहे. आपण त्यानुसार मेडिकल कॅम्प त्याच्यामध्ये कुठलेही पैसे घेतले जात नाहीत. सर्व औषधे आपण फ्री देत असतो. रात्री ८-९ वाजले काही झाले तरी हरकत नाही मला पेणकरपाड्याची माहिती मिळाल्यानंतर रात्री अडीच वाजेपर्यंत आम्ही त्या दिवशी पेशन्ट बधितले. जास्तीत जास्त प्रयत्न केले जातात. ह्याच्यामध्ये आणखी काही सुचना असल्या तर त्या सुचनांचा नक्कीच विचार करु. आणि त्यानुसार अंमळबजावणी करु. आपल्या सर्वांचे याकामी खुप मोठे सहकार्य लाभलेले आहे. आणखी आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे. आपण ज्याप्रमाणे सांगाल तर खाजगी डॉक्टरांची मदत घेउ. त्याच्यामध्ये कुठलाही प्रश्न येणार नाही. आपल्याला जास्तीत जास्त प्रयत्न करायचे आहेत. आणि या संकटाला आपल्याला तोंड द्यायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

डेंग्युचे किती पेशन्ट आहेत.

**रक्षा शहा :-**

माझी एक सुचना आहे की तुम्ही सांगता जॉन्डीसचे फक्त दोनच पेशन्ट आहेत का?

**आसिफ पटेल :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की क्लासिक मिलजवळ झोपडपट्टी आहे तिथे काल एक माणूस लेप्टेस्पायरसीसच्या आजाराने गमवला गेला. तसेच पेणकरपाड्याचासुध्दा एक माणूस गमावला. मी तुम्हाला वेळोवेळी फोन करुन सांगतो की पेणकरपाड्याच्या तलावामध्ये मासे मेलेले आहेत. तसेच तलावामध्ये शेण जमा झालेले आहे. त्याच्यामधून महामारी पसरण्याची संभवना आहे. तिथे औषध फवारणी करा म्हणून सांगतो तरी तुम्ही ऐकत नाही. आणि तुम्हीच सांगता की नगरसेवक आम्हाला सहकार्य करतात. तुम्हाला प्रभाग अध्यक्ष फोन करतो तर तुम्ही दाद देत नाही याचा अर्थ काय आहे?

**डॉ. बावस्कर :-**

साहेब आपण प्रत्येक वेळेला जे-जे काम सांगितले ते केलेले आहे.

**आसिफ पटेल :-**

मी आठ दिवस प्रत्येक वेळेला फॉलो-अप करतो की तिथे फवारणी करा त्याठिकाणी आजार पसरलेला आहे.

**डॉ. बावस्कर :-**

त्या ठिकाणी फवारणी केलेली आहे.

**आसिफ पटेल :-**

फवारणी केलेली नाही. मी तिथे रोज चक्कर मारतो. तुम्ही म्हणता फवारणी केलेली आहे. फवारणी कोणी केलेली आहे त्याला समोर उभे करा.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, तुम्ही म्हणता महामारी पसरलेली आहे.

**डॉ. बावस्कर :-**

मी त्याचे रेकॉर्ड आपणांस दाखवून देईन.

**आसिफ पटेल :-**

आपण महासभेपुढे ते रेकॉर्ड दाखवा. कोणी फवारणी केलेली आहे ते तुम्ही आम्हाला दाखवा. असे चालणार नाही. तुम्हाला राउन्ड मारायला सांगितला होता तरी तुम्ही राउन्ड मारलेला नाही. आपण प्रत्यक्ष दहा मिनिटासाठी येउन जा असे मी वारंवार म्हटलेले आहे.

**डॉ. बावस्कर :-**

मी त्या ठिकाणी जाउन आलेलो आहे. आपले सन्मा. नगरसेवक म्हात्रे साहेब, मा. महापौर मॅडम तिथे होत्या. माझी आणि त्यांची भेट झालेली आहे. मी त्या ठिकाणी पाहणी केलेली आहे.

**आसिफ पटेल :-**

पाहणी केलेली आहे असे तुमचे म्हणणे आहे का?

**डॉ. बावस्कर :-**

मी आपल्याला माहिती देतो. मला सांगितले की फवारणी केलेली आहे.

**आसिफ पटेल :-**

ती फवारणी कोणी केलेली आहे?

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम आप दवाईयोंका स्टॉक जादा रखिए। ऐसा न हो की आप ऐन वक्तपर बोले की दवाईया नही है, कम पड गई है। बिमारीयाँ दिन ब दिन बढते जा रही है। इसप्रकारका समाचार मिल रहा है।

**डॉ. बावस्कर:-**

औषधांचा साठा पुरेशा प्रमाणात आहे. त्यामुळे कुठेही प्रॉब्लम नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

फवारणी की नही जाती है।

**सुरेखा गायकवाड :-**

विजय पार्क, गोकुलधाम, शांतीनगर, सत्यम या बिल्डींगच्या इकडे फवारणी झालेली नाही.

**सुधा गोयंका :-**

अगर अपने पास आदमी कम है तो हमारे कार्यकर्ता लिजिए। लेकीन जगह-जगह पर सामान पहुँचा दिजिए।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांना डॉ. बावस्करांनी उत्तर दिलेले आहे. तरी आपण सर्व सन्मा. सदस्यांनी खाली बसावे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, सन्मा. विरोधी पक्षनेते परशुराम पाटील साहेब आपणांस सांगतो की मा. महापौर मॅडम उभ्या तरी आपण असून घ्यावे. प्रत्येक सन्मा. सदस्यांनी मा. महापौर मॅडम उभ्या असताना बसून घ्यावे. व प्रत्येक सन्मा. सदस्यांनी सौजन्य हे पाळायला हवे.

**मा. महापौर :-**

मा. विरोधी पक्षनेते श्री. परशुराम पाप्टील साहेब, डॉ. बावस्करांनी दिलेल्या उत्तराने आपले समाधान झालेले आहे ना! जर काही बोलायचे असेल तर ते दोन मिनिटातच बोला.

**परशुराम पाटील:-**

होय. मी दोन मिनिटातच माझे म्हणने मांडतो. डॉक्टरसाहेब, आपण ज्या ठिकाणी पाहणी केली ते आम्ही मान्य करतो. परंतु माझे म्हणने एवढेच आहे की संपूर्ण परिसरामध्ये, आपल्या मिरा भाईंदरमध्ये जे सगळे प्रायव्हेट हॉस्पीटल आहेत. तर त्या प्रायव्हेट हॉस्पीटलमध्ये एखाद्या सामान्य माणसाला ते परवडण्यासारखे नाही. तरी आपण प्रशासनाच्यावतीने त्यांना काय देणार आहात? आणि काय प्रयत्न करणार आहात. आणि आतापर्यंत आपण त्यांना काय मदत केली?

**(सभागृहात गोंधळ)**

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, मेरी एक सुचना है। बरेक जो संस्था है। बरेक संस्था हम लोग जो थोडी-थोडी दवाईयॉ पहूँचायेंगे तो अपने महानगरपालिका पुरा शहरमे पहूँच नही पायेगी। जैसे जैन मंदिर है, स्वामी नाराणण मंदिर है।

**डॉ. बावस्कर :-**

साहेब, संस्थामे से जो भी आते है उनको को हम लोग मेडिसिन दे रहे है। उसमे प्रॉब्लम नही है। हिसाब बादमे देखा जायेगा। मगर अभी इर्मजन्सीमे सबको दवाईयॉ दे रहे है। जो भी आये उसको दवाई देते है।

**हंसुकुमार पांडे :-**

डॉक्टर साहेब आपने जो लेप्टोस्पायरसीस मृत्युका आकडा दिया है। मेरे हिसाबसे या तो आकडा गलत है। या फिर आप लोग सभागृहको जानबुझकर गलत जानकारी दे रहे है। मेरे वॉर्डमे ऐसे दो लोगोंकी मृत्यु हो चुकी है, और हमारे और जो नगरसेवक है उनके पास मृत्युका रेकॉर्ड है। मै आपसे और सभागृहसे विनंती है उस बाढ पिढीत बिमारीयोंसे जिनकी मृत्यु हुई है, उन लोगोको एक-एक लाख रुपये दंड का उनके परिवारवालोंको मुआवजा दिया जाए।

**संजय पांगे :-**

डॉक्टर साहेब, आपण सभागृहाला अपूर्ण माहिती देत आहात. अन्वर इक्बाल खान, मिरा रोड याची १० तारखेला सुशील हॉस्पीटलमध्ये डेथ झालेली आहे. त्याच्या डेथचे सर्टिफिकेट आता माझ्या हातामध्ये आहे.

**डॉ. बावस्कर :-**

मी ह्याची माहिती घेतो.

**(सभागृहात गांधळ)**

**रक्षा शहा :-**

मा. महापौर मॅडमच्या आदेशाने बोलते की डॉक्टरसाहेब मी आपल्याला माहिती दिलेली होती की महावीर अपार्टमेन्टला कमीतकमी सहा-सात कार्यवाहीची प्रकरणे आहेत. मी शिंदे साहेबांच्या थ्रु महानगरपालिकेचेच डॉक्टर पाठविले होते. आणि तिथे उपचार चालु आहेत. तसेच आरोग्याच्या दृष्टीकोनातुन

बधितले तर मी पाच वेळा पत्र दिलेले आहे की आमचा आरोग्याचा प्रस्ताव ऐकून घ्यावा. परंतु तो स्लॅब पुर्णपणे धोकादायक आहे. कुठेतरी पडले की तिथे आणखी प्रकरण पडणार आहे. तसे झालेले आहे. खाली जे लोक राहतात तिथे पश्चिम साईडला मॅडमनी उल्लेख केलेला नाही. पश्चिमला दोन ते तीन फुट पाणी भरलेले होते. त्या एरियामध्ये कमीत कमी दोन ते अडीच गाड्या कचरा त्या प्लॉटमध्ये असेल मी किती वेळा सांगून तुम्ही बिल्डरला नोटीस पाठवत नाही की त्याची तोडायचीसुध्दा काही कार्यवाही करीत नाही. त्या बिल्डींगला स्टे किंवा नगरपालिकेचे सी. सी. सुध्दा नाही. मग त्याच्यावर कार्यवाही काय करणार? तिथे प्लेगसारखे वातावरण निर्माण होणार आहे. तरी ते आरोग्याला धोकादायक असून तुम्ही तेथील लोकांची काय सोय करणार आहात ते आम्हाला सांगा.

**संजय पांगे :-**

आमच्याकडे लेप्टोस्पायरसीसचे सर्टिफिकेट आहे ते बघून घ्या.

**रक्षा शहा :-**

तिथे उंदीर आणि महामारीचा खतरा आहे. दिड दोन ट्रक भरुन तिथे कचरा पडलेला आहे. खांबितना बोलावून घ्या. मी सगळ्याच अधिका-यांना सांगतो की माझे पाच पत्रव्यवहार झालेले आहेत. मला अजूनपर्यंत एकाचेही उत्तर आलेले नाही.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते आणि त्यांच्या निदर्शनास आणू इच्छिते की आता एवढा आरोग्याचा दृष्टीकोनातुन आणि अतिवृष्टीमुळे जे आजारपण झालेले आहे. त्याची साक्ष आताच डॉक्टर साहेबांनी दिलेली आहे. परंतु आमच्या प्रभागामध्ये दहा-पंधरा दिवस तो कचरा उचलला जात नाही. त्याची प्रथम व्यवस्था करा.

**रक्षा शहा :-**

पार्श्वनगर नं. २ ला सहा काविळीच्या केसेस आहेत. तीसुध्दा नोंद करा आणि आपल्याला तिथे घरोघरी डॉक्टर पाठवायला पाहीजे.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, पत्रकार कक्षामध्ये पत्रकार व्यतिरिक्त अन्य कोणीतरी बसलेले आहेत. पत्रकारांनी आजच्या या सभेस बहिष्कार टाकलेला आहे. पत्रकार कक्षात अन्य माणसांस बसू देउ नये. आताच्या आता खाली करुन पत्रकारांना त्या ठिकाणी बसण्याची व्यवस्था करावी. प्रथम तसे आदेश द्या.

**डॉ. रमेश जैन :-**

मा. महापौर मॅडम, हर विभागसे तीन जॉन्डीसके केस आते है। मेरे डिस्पॅचमे कमसेकम १० से १२ केसेस  है और आपने बोला की फवारणी की जाती है लेकीन हमारे यहॉ आठ दिन तक हमारे वॉर्डमे कोई फवारणी करनेके लिए आते नही।

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की सिल्वर प्लाझा, बेव्हर्ली पार्क..........

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या सुरेखा गायकवाड आपण खाली बसून घ्या. डॉक्टर जे सविस्तर माहिती देतात ती माहिती आपण पूर्णपणे ऐकूण घ्या. आपली जी सुचना असेल तर ती दोन मिनिटात मांडण्याचा प्रयत्न करा. आपल्या सर्व सन्मा. सदस्यांचा सुचना ह्या समजलेल्या आहेत. त्या पुर परिस्थितीचे गांभीर्य आम्हालासुध्दा आहे. आपल्याला त्याच्यावर नियोजन करण्यासाठी २९ तारखेला जी आपत्कालीन बैठक मा. महापौर दालनात बोलावलेली होती त्या विषयावर आपण मोठ्या प्रमाणात चर्चा घडवून आणलेली आहे. पुढे आरोग्याचा कुठलाही विषय किंवा आरोग्य अडचणीत येउ नये आणि अडचणी संभवू नये म्हणून आपण वेळोवेळी तशा प्रकारचे आयोजन केलेले आहे.  त्यासाठी आपल्याला त्याच्यामध्ये डॉ. बावस्कर आणि कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभत आहे.  आपणही त्यांना सहकार्य करा आणि एकत्र येउन ह्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करा. आपल्या सुचना ह्या थोडक्यात मांडा.

**रक्षा शहा :-**

मा. महापौर मॅडम आपण जी काही कार्यवाही करत आहात त्याबद्दल आपण चांगलेच करत आहात परंतु त्यात जो एरिया आहे तो चुकीने राहत आहे. आम्ही तसेच या ठिकाणी व्यवस्थित मांडतो. तुम्ही पश्चिम भागात काही पाणी भरलेले नाही. असे सांगत असतानाच मी बोलली की, तिथे दोन ते अडीच फुट पाणी होते. त्या एरियामध्ये खुप अशी प्रकरणे आहेत की त्या ठिकाणी कावीळ आणि महामारीचे प्रश्न उद्भवलेले आहेत. तुम्ही आम्ही सांगतो की डॉक्टर बावस्कर साहेब आपण त्याच्यावर कार्यवाही करावी आणि त्या स्लॅबसाठी तुम्ही..........

**डॉ. बावस्कर :-**

मा. महापौर महोदया, आज जी परिस्थिती उद्भवलेली आहे संपूर्ण परिसरात खाजगी डॉक्टरांच्या मदतीने आपल्याला कॅम्प लावायची आपली तयारी आहे. आपल्याला जेवढी औषधे लागतील तेवढी औषधे

आपल्याकडे उपलब्ध असून औषधांची कुठेही कमतरता नाही. आपण फक्त मला फोनवर माहिती दिली तरी चालेल मी कॅम्प लावत असतो आपल्या सर्वांना माहित आहे. आपण मला फोन करुन एक दिवस अगोदर कळवा. किंवा दोन दिवस अगोदर मला कळवा. ज्या-ज्या विभागात आपल्याकडे खाजगी डॉक्टर असतील चांगले होईल कारण आपले डॉक्टर सगळ्या ठिकाणी पुरे पडू शकत नाहीत. खाजगी डॉक्टरांनी जर कॅम्प लावले तर आपण मोफत औषधे देतो. आपण औषधांचे सध्या काही कोणाला विचारत नाही किंवा कुठला पैसा घेत नाही. आपण ज्या-ज्या ठिकाणी पुढाकार घेतो आपण पुढाकार घेउन कॅम्प लावला तर मी त्या-त्या ठिकाणी हजर राहून आपले त्या-त्या ठिकाणी डॉक्टरसुध्दा जातील. आपण ऐरिया, विभागात डॉक्टर बोलावले तर आपल्याला ह्याच्यावर जेव्हा जेव्हा आपण कॅम्प लावायला सांगाल त्या-त्यावेळी कॅम्प लावण्याची आपली तयारी आहे. आपल्याला जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवायचे आहे. त्याच्यासाठी आपल्या सगळयांची मदत पाहिजे. दुसरे म्हणजे जर आपल्याला विभागामध्ये आज आपल्याकडे कुठलाही वॉर्ड नाही किंवा त्याच्यासाठी व्यवस्था नाही. जर अशाप्रकारचा वॉर्ड सुरु करायचा झाला तर आपण खाजगी डॉक्टरच्या मदतीने हा वॉर्ड सुरु करु शकतो.

**परशुराम पाटील :-**

साहेब, आता आमच्या भागातील जो माणूस मेलेला आहे.  त्याच्यासाठी माझे थोडक्यात असे म्हणणे आहे की, त्याला आपल्या प्रशासनाकडून काय आर्थिक मदत मिळेल म्हणजे त्या माणसाचे एका दिवसामध्ये रु. ४० हजार जमले.  परंतु आपल्याकडून त्याला कोणते इंजेक्शन किंवा औषधोपचार दिले गेले.

**डॉ. बावस्कर :-**

आपण फक्त जे रुग्ण कॅम्पमधून आपल्या विभागात येतात किंवा आपल्या काही संस्था आहेत.

**परशुराम पाटील :-**

आपण बोलता की आपल्याकडे दव्याचा स्टॉक भरपूर आहे मग त्याच्यामध्ये कोणते-कोणते इंजेक्शन आहेत. ते त्यांना दिले गेले का?

**डॉ. बावस्कर :-**

मला त्याची माहिती नाही. मी आपल्याला माहिती घेउन सांगेन विनाकारण खोटे बोलण्यात काही अर्थ नाही.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, मी गेले तीन महिने पत्रव्यवहार केलेला आहे. सिल्व्हर पार्क, बेव्हर्ली पार्क, हरिया ड्रीम पार्क आणि सुंदरनगर या ठिकाणी बऱ्याच वेळा पत्रव्यवहार करुनसुध्दा आपल्या आरोग्य विभागाचे कचरा उचलण्यासाठी गाडी जात नाही आणि आपण अधिकाऱ्यांना सांगितले तर ही लोक सांगतात की, भाईंदरमध्ये हा प्रभाग येतो.  तर तुम्ही ते भाईंदरवाल्यांना सांगा.  मी ही तक्रार नेहमी मिरा रोडला करते.  मिरा रोडचे अधिकारी सांगतात की, तुम्ही भाईंदरवाल्यांना सांगा.  परंतु हे सर्व सांगुन काहीही उपयोग होत नाही.  सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहेबांनीसुध्दा गेल्या वेळेला ही माहिती दिली होती की, तुमच्या प्रभागात काही ह्या बिल्डींग येत आहेत आणि त्या बिल्डींगमध्ये पाउस पडल्यामुळे बरेच लोक आजारी आहेत.  कालच तेथील रहिवासी श्री. पांडेजी माझ्याकडे आले होते. उलटी, जुलाबाचे बरेचसे रुग्ण त्या ठिकाणी आढळलेले आहेत. आणि आपले कर्मचारी अजुनपर्यंत तिथे अजूनपर्यंत पोहचलेले नाहीत. अशी त्यांची लेखी तक्रार माझ्याकडे आलेली आहे. तरी आपण त्यांच्यावर काही कार्यवाही करणार आहात की नाही. कारण तीन महिने झाले मी ह्या गोष्टीचा पाठपुरवठा करीत आहे.

**मा. महापौर :-**

आपली सुचना लक्षात आलेली आहे. आणि त्याच्यावर लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करावी.

**(सभागृहात गोंधळ)**

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आम्ही बोलायला लागलो की तुम्ही जे निवेदन केले त्याबद्दल आम्हाला बोलायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यावर सविस्तर चर्चा झाली पाहिजे.

**मा. महापौर :-**

सविस्तर चर्चा झालेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जे निवेदन केलेले आहे त्याविषयावरती आम्हाला बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

आपल्या सुचना ह्या लेखी स्वरुपात द्याव्यात.

**मिलन म्हात्रे :-**

सभागृहामध्ये निवेदन दिल्याशिवाय आम्ही सभा चालु देणार नाही. सभा चालणार नाही.

**गजानन भोईर :-**

आम्ही ह्या विषयाबाबत बोलण्यासाठी कधीपासून परवानगी मागत आहोत. तरी आम्हाला ह्या विषयावर बोलायचे आहे. शहरामध्ये एवढा अशाप्रकारचा गंभीर प्रकार घडलेला असताना...........

**कैलासबेन जानी :-**

मग चर्चा होउ द्या.

**रोहीदास पाटील :-**

तुम्हाला निवेदन करायला लागेल. या शहरातील आणीबाणीचा प्रश्न आहे. तुम्ही मा. आयुक्त साहेबांचे अभिनंदन केले.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही एकतर ११ वाजताच मिटींग चालु करायला पाहिजे होती.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही आधी मिटींग का चालु केली नाही? तुम्हाला ११ ची वेळ माहिती होती मग तुम्ही लेट का करता? आम्हाला सगळ्या सन्मा. सदस्यांना बोलायला संधी द्या.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम...................

**(सभागृहात गोंधळ)**

**मिलन म्हात्रे :-**

चर्चा ही सविस्तर होउ द्या.

**मोहन पाटील :-**

अहो ही काय पध्दत आहे?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यहॉपर शिस्त है क्या?

**संजय पांगे :-**

एवढा गंभीर विषय असताना आपण दुसरा विषय चालु करत आहात.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्यांनी कृपया सभागृहामध्ये शांतता ठेवावी.

**रक्षा शाह :-**

मा. महापौर मॅडम, चर्चा होउ द्या.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौरांनी निवेदन केल्याशिवाय सभागृहाचे कामकाज चालु शकत नाही.

**मा. उपमहापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करण्यांत येते की, मा. महापौरांना विनंती करतो की सन्मा. सदस्यांना दोन-दोन मिनिटे बोलण्याची संधी द्यावी. दोन-दोन मिनिटांत आपले निवेदन समाप्त करावे. मिरा भाईंदर शहरामध्ये जी परिस्थिती उद्भवलेली आहे, संपूर्ण महाराष्ट्रात ती परिस्थिती आहे. मिरा भाईंदरचे लोकप्रतिनिधी आणि सर्व अधिकारी याकामामध्ये व्यक्तीशः जास्तीत जास्त वेळ देउन जास्तीत जास्त काम करीत आहे. आणि त्याच्यामुळे आपल्याकडे कमीत कमी रोगराई कशी पसरेल किंवा पसरणार नाही त्याबद्दल आपल्याला प्रत्येकाला काळजी घ्यायची आहे. आपल्या सुचनेचे स्वागत आहे परंतु सुचना ह्या थोडक्यात असल्या तर ते अधिक चांगले राहील.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आपण मला परवानगी दिली आहे का? मा. महापौर मॅडम मी मघापासून हात वर करुन परवानगी मागत आहे.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय आणि मा. उपायुक्त रणखांब साहेब शहरामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये एवढा गंभीर प्रसंग आला असतांनासुध्दा आपण त्या प्रसंगाचे किती गांभीर्याने घेत आहोत हे एकंदरीत आता दिसत आहे. मा. महापौर मॅडम, पिठासीन अधिकारी पुढचा विषय पुकारताच यांचेवरुन त्यांचे गांभीर्य दिसत आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील साहेब २९ जुलैला आपतकालीन बैठक बोलावली होती आणि याच्यावर सविस्तर चर्चा झालेली आहे. प्रोसेडींगमधून हे शब्द काढून टाकावेत विनाकारण शब्दांचा योग्य तो वापर करावा आपण आले नाहीत. सर्व सदस्यांना बोलावले होते आणि आपतकालीन बैठक बोलावलेली होती आणि त्या विषयावरती सविसतर चर्चा झालेली आहे तुम्ही विनाकारण येथे वेळ दवडता आहात.

**जयंत पाटील :-**

आम्हाला या विषयाबाबत माहिती नाही. आम्हाला बोलावले नाही. या शहरामध्ये आपण चुकीचे मघाशी जे निवेदन केले आपण जे लिहून आणलेले निवेदन ते कोणी लिहून दिले याबाबत आम्हांस कल्पना नाही. अतिशय चुकीचे निवेदन आपण केलेले आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील आपणांस जे निवेदन चुकीचे वाटते ते निवेदन चुकीचे नाही. प्रोसेडिंगमधून ते शब्द काढून टाकण्यांत येतील. ते चुकीचे निवेदन नाही.

**जयंत पाटील :-**

माझे म्हणणे चुकीचे आहे तरी चुकीचे हा शब्द तुम्ही काढू शकत नाही तो असंसदियक शब्द नाही. कुठला शब्द काढायचा आणि कुठला नाही मा. महापौर मॅडम आपण ते प्रथम वाचून घ्या. असंसदियक शब्द असेल तर तो तुम्ही काढावा. चुकीचा शब्द हा असंसदियक आहे का?

**मा. महापौर :-**

मा. पिठासीन अधिकाऱ्यांना ते पूर्णपणे अधिकार आहेत, कुठला शब्द काढायचा आणि कुठले शब्द ठेवायचे.

**जयंत पाटील :-**

मा. पिठासीन अधिकारी काही करु शकत नाही तो शब्द जर माझा चुकीचा असेल तर माझे असे मत आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील आपण याबाबत तज्ञ आहात हे आम्हाला माहित आहे परंतु आपण जरा भान ठेउन योग्य पध्दतीने बोलावे तरी आपला तो सन्मानच आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम मला कसे बोलायचे आणि काय बोलायचे हे मला सुदैवाने चांगलेच कळते. या शहरामध्ये एवढी परिस्थिती घडली असताना आपण आपले जे लिहून दिलेले निवेदन आपले लिहलेले असेल तरी मी अजुनही म्हणतो आहे की ते आपण चुकीचे वाचलले आहे की या शहरामध्ये अशी मोठी घटना घडलेली आहे, असे वाक्य आपण त्याच्यामध्ये वाचलेले आहे. नवघर गांव प्रभाग क्र. ९ हे दोन तृतीयांश पाण्याखाली गेलेले होते आपण म्हणतात की पाण्याखाली गेलेले नाही. या शहरामध्ये आज एवढी लोक मरतात मग आपण काय त्याची नांवेवाचून दाखवायची? तुम्ही काय त्यांचे सांत्वन केले, त्यांच्या घरी जाउन आणि त्यांना काय आर्थिक मदत केली? कुठल्या त-हेचे आर्थिक मदत नाही फक्त बावस्कर साहेब आले आणि लिस्ट वाचून दाखविली. ही लिस्ट पाहिल्यानंतर आपल्याला या शहराची परिस्थिती लक्षात येईल किती बिकट परिस्थिती आहे आणि असे असताना आपण पुढचे विषय पुकारायला निघाले होते आपण ह्या विषयाचे गांभीर्य चांगल्या प्रकारे घ्यायला पाहिजे, आणि ते ओळखायला पाहिजे. कुठल्याही त-हेची आपतकालीन परिस्थिती उद्भवल्यानंतर डिझास्टर मॅनेजमेंट या शहरामध्ये नाही लक्षात घ्या मी अगोदरपासुनच सांगतो आहे गेल्या एक वर्षापासुन सांगत आहे की महापौर निधी तयार करा. दुदैवाने आपण ते कधी मनावर घेतलेले नाही. मा. महापौर मॅडम, महापौर निघी घ्या म्हणून मी दोन वर्षापासून सांगत आहे. सभागृहाला ह्या संपूर्ण गोष्टी माहित आहेत. मी आपल्यावर आरोप करत नाही किंवा दोष देत नाही. आपण ह्या शहरामध्ये पहिल्यांदा निवडणूक लढवून नगरसेविका झालात आणि त्यानंतर महापौर झालेल्या आहात. परंतु गेली कित्येक वर्ष आम्ही बघतो आहे की या शहराचे काय व्हायला पाहिजे ही आपतकालीन परिस्थिती ह्या शहरामध्ये का आली? हा पुर ह्या शहरामध्ये का आला? पाणी आले आणि गेले परंतु ते का आले कारण एकही गटार हे तुमचे मोकळे नव्हते. ज्या-ज्या ठिकाणी गटारामध्ये पाईप टाकलेले आहेत. हायवेचे संपूर्ण जे काही नाले आहेत ते उघडे आहेत ती संपूर्ण बंद आहेत त्यामुळे तुमचा घोडबंदर परिसर डुबला गेला. आणि ते आलेले संपूर्ण पाणी भाईंदर आणि नवघर गांवामध्ये पसरले गेले. त्याला जबाबदार कोण? लेप्टोस्पायरससारखा अत्यंत घातक रोग शहरामध्ये आज पसरलेला आहे. ही गंभीर परिस्थिती ह्या शहरामध्ये नाही का? तुम्ही फक्त लिस्ट वाचून दाखविली. मरणानंतर तुम्ही काय करणार आहात? आले गेले आणि मेले आमच्यासारखे प्रतिनिधी या शहरामध्ये असताना अशात-हेची घटना आम्ही ती गांभीर्यानेच घेणार. आम्ही काहीही ऐकून घेणार नाही. कृपया हा विषय लांबवायचा असेल तर लांबवामी काही दोन मिनिटे बोला असे म्हणणार नाही कारण प्रत्येकाच्या भावना ह्या तीव्र आहेत. त्याचप्रमाणे आपण प्रत्येकाला बोलण्याची परवानगी दिली पाहिजे आणि त्याच्यातले आपण काहीतरी घेतले पाहिजे. ही आपतकालीन परिस्थिती कधीही या शहरामध्ये येणार नाही याचा आपण विचार केला पाहिजे. तरी आपण हा विचार करणार नाहीत का? तर त्यांना आपण काहीही आर्थिक मदत केलेली नाही. ज्या घरामध्ये एखादा माणूस आजारी पडतो तर तो कुठल्याही हॉस्पीटलमध्ये जाउ शकातो. त्याची आर्थिक परिस्थिती जरी खराब असली तरी घरातील दागदागीने विकून तो चांगल्या हॉस्पीटलमध्ये जाउ शकतो. कारण त्यांना त्यांचे मुल वाचवायचे असते, त्यांना त्यांचे आई वडील वाचवायचे असते मग आपल्याकडे त्यांना मदत करण्यासारखी काय परिस्थिती आहे? आपण कृपया हा विषय मा. महापौर मॅडम गांभीर्याने घ्या.

मी काही आपल्यावर क्लेम करीत नाही आपण असा काही गैरसमज करुन घेउ नका. माझी आपणांस विनंती आहे की हा विषय अतिशय गांभीर्याने घ्यावा. संपूर्ण महाराष्ट्राने हा विषय गांभीर्याने झोतलेला आहे. थॅंक्यु.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, मा. महापौरांनी जे निवेदन केले त्या निवेदनातच त्यांनी आपला जो पूर्ण महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कठीण प्रसंग सुरु असतानाच आपले मा. आयुक्त येथुन त्यांची बदली कल्याण-डोंबीवली महानगरपालिकेत झाली येथुन गेल्याबद्दल त्यांनी त्यांना धन्यवाद दिले आणि तिथे त्यांनी चार्ज घेतल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. आणि आता नविन जे आयुक्त येत आहेत मा. सुदामराव गायकवाड यांचेही मी अभिनंदन करतो, त्यांनाही संपूर्ण हे सभागृह सहकार्य करील अशी अपेक्षाही करतो पण हा प्रसंग जसा सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी सांगितला आणि आपल्या निवेदनात किती विसंगती होत्या तेवढेच दाखविण्याचा मी प्रयत्न करीन. या शहरात, या राज्यात राष्ट्रवादी आणि कॉंग्रेस ते राज्य करतील आजची जी स्थिती आहे ती पुरस्थिती पाउस पडला म्हणून पूर आला असे सांगुन डंका पिटविला जात आहे परंतु सत्यस्थिती जी आहे ती फक्त मी मिरा भाईंदरपुरते बोलतो आहे. मिरा भाईंदर शहरामध्ये किंवा या महानगरपालिका हद्दीमध्ये चेना ते दहिसर चेकनाका या पट्टयामध्ये जो पुर आला त्या पुराचे स्वरुप काय होते त्या स्वरुपाला कोण जबाबदार हे जोपर्यंत हे सभागृह नीट समजून घेत नाही सगळे सदस्य, सगळे अधिकारी तोपर्यंत असे अनेक पूर येतील आणि अनेक पूर जातील. त्यातील चार कारणे आहेत या महापालिकेच्या सभागृहाने किंवा महापालिकेच्या अधिका-याने मी अधिका-याकडून अगोदर अपेक्षा करतो की हा कधी विचारच केला नाही की या शहरामध्ये येथे सांडपाण्याचा निचरा व्हायला पाहिजे, या शहरामध्ये पावसाली पाण्याचा निचरा व्हायला पाहिजे, या शहरामध्ये येणा-या भरतीच्या पाण्याचा निचरा व्हायला पाहिजे. या शहरामध्ये रोज येणा-या ८० एम.एल.डी. पाणी आहे त्याचा विचार व्हायला पाहिजे. आणि या शहरामध्ये या शहराला लागून काशी आणि मिऱ्याचा डोंगर. हा डोंगर कधी पोटात पाणी ठेवत नाही जो पाउस पडेल तो पूर्णपणे खाली येईल आणि पहिली अशी वस्तुस्थिती होती की जेव्हा काशी आणि मिरा येथील डोंगरावरुन पाणी यायचे ते मिरा रोडच्या संपूर्ण भागामध्ये कॅचमेन एरियासारखे साचले जायचे परंतु ते आता एरियाची संपलेली आहे मग त्याचा निचरा होण्याच्यादृष्टीने पावसाचे पाणी, सांडपाणी, ८० एम.एल.डी. पाणी आणि पूराचे पाणी या पाच गोष्टींचा विचार करतेवेळी या शहरामध्ये पुन्हा पुन्हा डांबरीकरण करुन रस्त्याची एक फुट उंची वाढली. या गोष्टीचा विचार आपल्या शहर अभियंत्यांनी किंवा नियोजकांनी किंवा राज्यकर्त्यांनी कधी करण्याचा विचार केलेला नाही आणि म्हणूण हे उद्‌भवले. यातले एक मुख्य कारण मी देतो आहे हे लेखी देउनसुध्दा अजुनही अधिका-यांनी कुठलेही कार्यवाही केलेली नाही. दहिसर चेकनाका ते वर्सोवा ब्रीज हा जेव्हा १९६३ बनला त्यावेळेच्या त्या अधिका-याने दुरदृष्टीकोन ठेवून हे ऐवढो मोठे शहर वाढेल हे त्यांना माहित नव्हते. ते डोंगर होते तरीसुध्दा त्यातुन पाण्याचा निचरा होण्यासाठी तेरा उघाड्या ठेवल्या होत्या. आपल्या राज्यामध्ये त्यातले पाच उघाड्यामधून पाणी जाते. दुस-या उघाड्या ह्या बंद आहेतआणि मा. आयुक्तांना त्या हायवेवाल्यांनी लिहून दिले तरीसुध्दा दहा दिवसामध्ये किंवा आजच्या घटकेला एकही उघाडीवर काम केलेले नाही. आम्हाला नाईलाजाने त्यांना मोर्चाची नोटीस द्यायला लागली. २३ तारखेला असताना आम्ही ही नोटीस दिली ही झाली कामकाजाची पध्दती. आता जे आलेले पाणी ते जाणार कुठून? आपण इकडे म्हणतो की, मा. उपमहापौर मिरारोडमध्ये सर्व सत्ताधारी अहो जेव्हा पाणी जायचे असेल आणि त्याला वाटच नसेल आणि तुम्ही उंचावर राहत असाल तर त्या खालच्या भागात राहणाऱ्या लोकांचे तुम्हाला काय समजणार? जाफरी खाडीतुन येणारे पाणी जे जाणार नाही जे अनेक वर्षापासून आपण बोलतो, या सभागृहात बोलतो परंतु त्याला दुसरा नाला तयार केल्याचे आपले यश मिळालेले नाही. आपल्याला ते यश आलेले नाही. काही ते झोपेत झालेले नाही. त्याठिकाणी जर तीन नाले असते तर जाफरी खाडीच्या पूर्व बाजूला जे पाच फुट पाणी उंच होते आणि पश्चिम बाजूला जे पाच फुट पाणी खाली होते एक प्रवाह वाहत होता तो प्रवाह तो पाणी आटवू शकला नाही. पाणी चार दिवस भरुन का राहीले मी तुम्हाला उदाहरण देउन सांगतो कारण की जे सत्य आहे ते तुम्हाला लपवता येणार नाही. जेसलपार्कमध्ये अर्ध्या तासापेक्षा पाणी राहीलेले नाही ते ही पाणी कुत्रीमरित्या साचवले त्याचाही दोष आम्ही बावस्करांना दिला होता. हे जर तुम्ही नाले साफ ठेवले असते तर त्या जेसलपार्कमध्ये पाणी चढले नसते. आजही सांगतो कसेही सांगितले तरी जेसलपार्कमध्ये पाणी चढणार नाही, स्टेशनरोडला पाणी चढणार नाही, त्याचबरोबर कॉलेज जवळचा नाला; कॉलेज जवळचा नाला बनवितेवेळी येथील अनेक मान्यवरांनी विरोध केला. आयुक्त साहेबांनी हात टेकले तो नाला जर झाला असता तर त्या भागातील पाणी गोडदेव नाका, बी.पी. रोड, नवघर रोड हे रोड सुके राहीले असते. ज्यावेळी पाउस पडत होता त्याचवेळी कॉलेज समोरचा नाला रस्त्यापेक्षा दिड फुट खाली लेव्हलला वाहत होता. जेव्हा मिरारोडहून लोंढा आला आणि दत्त मंदिरमध्ये पाणी घुसले हे कशाचे लक्षण आहे. हे आपलेच अपयश आहे. हे पूर्ण महापालिकेच्या सत्ताधारी पक्षाचे व प्रशासनाचे अपयश आहे. लोकांच्या भावनेशी आपण खेळ करता. पाणी आले पाणी गेले. आम्ही कार्यालयात तुम्हां सगळ्यांना धन्यवाद देउ की आपण त्यादिवशी काम हे चांगले केले असेल पण त्याआधी चुका केल्या त्यास जबाबदार कोण? ज्या आधी चुका केल्या त्याची जबाबदारी तुम्ही घ्यायला पाहिजे. सत्ताधारी म्हणून जबाबदारी तुम्ही घेतली पाहिजे. आणि स्थायी समितीचे अध्यक्ष आहेत तेव्हा त्यांनी विरोध केला परंतु आज केबिन रोडला पाणी चार चार दिवस भरुन राहते. कशासाठी रहाते?

(सभागृहात गोंधळ)

**लिओ कोलासो :-**

हे याबाबत राजकारण करु पहात आहेत.

**मोहन पाटील :-**

मुंबई महानगरपालिका हद्दीमध्ये ऐवढे मोठे नुकसान झाले तर त्यांच्या प्रति उत्तरामध्ये मा. लालकृष्ण अडवाणी साहेब यांनी सांगितले की, महानगरपालिकेची चूक नाही तर त्या ठिकाणीसुध्दा भाजपा-शिवसेनेची सत्ता आहे आणि मग असे जर आम्ही बोललो तर.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील इतर अनेक सन्मा. सदस्यांनासुध्दा बोलायचे आहे. आपले खुप काही बोलणे झालेले आहे. तरी कृपया इतर सन्मा. सदस्यांना बोलण्यास संधी द्यावी. आपल्या सर्व भावना ह्या पोहचल्या आहेत तरी सर्वांना आपल्या भावना व्यक्त करावयाच्या आहेत. कर्तृत्वाची जाणीव ही झालेली आहे आपण जे काही बोललात त्याबद्दल कर्तव्याची लाणीव झालेली आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब मा. महापौर मॅडमच्यावतीने मी आपल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर देत आहे. सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील साहेबांनी एक मुद्दा उपस्थित केला की मा. महापौरांनी निवेदन हे चुकीचे वाचले, की शहरात कुठे कुठे पाणी भरले होते. २६ तारखेला १ ते २ च्या दरम्यान जो पाउस पडला होता त्या पावसात जो-जो कोणी बाहेर असेल त्यांना कल्पना असेल असे मोठे मोठे पाण्याचे थेंब पडले. १ ते २ च्या दरम्यान आपल्याला कळायच्या आत मोठ मोठे पाण्याचे थेंब पडत होते अहो प्रत्येकाची आपली घरे आहेत आणि प्रत्येकाला वाटते की माझा टी.व्ही. सेफ झाला पाहिजे, माझे कपाट बाजूला घेतले पाहिजे किंवा चपला आणि बुटांचा जोड हा उचलला पाहिजे. त्याबद्दल कुणालाही कसलेही त्यावेळी भान राहिले नाही. एका तासात अतिशय वेगाने पाणी भरले. वरुन पाउस पाडला तर त्याला काय तुम्ही लोकप्रतिनिधींना जबाबदार म्हणून पकडणार का? चेरापूंजीचा रेकॉर्ड तोडणारा पाउस हा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये झाला. चेरापूंजीचा रेकॉर्ड तोडणारा पाउस हा सर्व ठिकाणी झाला. सन्मा सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब जरा ऐकूण घ्या जो तुम्ही आरोप केलात त्याचे उत्तर देत आहे. या शहरामध्ये पाउस पडला नाही तर सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी सांगितले की शहरात कुठे-कुठे पाणी भरले होते. जर शहरात कुठे पाणी भरले होते असा प्रश्न जर विचारला असता तर ते संयुक्तीक झाले असते. जेव्हा मिरा भाईंदरमध्ये पाणी भरले होते असे सांगता येत नाही तर मुंबई, कल्याण, डोंबिवली, शहापूर, अंबरनाथ, वसई, बदलापूर, नालासोपारा कुठे पाणी नाही भरले तर संपूर्ण कोकणात पाणी भरले. परंतु या सगल्यामध्ये आपण आपली बाजू अतिशय सुरक्षितपणे मांडू इच्छितो की मिरा भाईंदरमध्ये ज्या-ज्या घरामध्ये, ज्या-ज्या युनिटमध्ये पाणी गेले त्याची संख्या किती आहेत तर ८५४१ आहे. त्यापैकी १४९२ लोकांना मदत दिलेली आहे. तर सरकारसुध्दा सांगते की इतर ठिकाणची मदत ही जास्त गरजेची असून आपल्या ठिकाणी ही कमी गरजेची आहे. ८४५१ झालेली असून दोन चार टक्के ही राहीलेली असतील तर त्याची ती ह्या एक दोन दिवसात होईल. परंतु स्वच्छता नाल्याची झाली नाही म्हणून जी वाच्यता केली तरी आपल्याला सांगतो या संपूर्ण शहराच्या इतिहासात काशिमिरा, मिरारोड, पेणकरपाडा या परिसरातुन निघणारे पाणी, ज्या डोंगराच्या पाण्याचा आपण उल्लेख करीत आहात. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या डोंगराचे पाणी हे उतरत असते ते काशिमिराहून जाते. जयाबाई यशंवत भोईर यांच्या बंगल्याच्या समोर जे पाणी साठलेले असते आजच्या या महापालिकेच्या, नगरपालिकेच्या, ग्रामपंचायतीच्या इतिहासात पहिल्यांदाच त्यांच्या घराच्या मागच्या बाजूस त्या पाण्यामध्ये बोटीमध्ये पोकलन टाकून पाण्यामधून आपण नाला खोदला होता. घोडबंदरची खाडी ही इतिहासात प्रथमच खोदली गेली हे माझ्या गावातील लोकांनी मला सांगितले आणि या खाडीला सहा दरवाजे आहेत. त्या खाडीला नउ दरवाजे करावे लागतील. तुम्ही का घोडबंदरची खाडी खोदली परंतु या शहराचे पाणी कुठून तरी निघायला पाहिजे. या मिरा भाईंदरच्या मुख्य रस्त्याला एकूण ११ आउटसेट आहेत. मा. माजी नगराध्यक्ष श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी मा. महापौरांना आपतकालीन बैठक बोलावली होती त्यावेळी त्यांनी सांगितले की नाले खोदले परंतु सदरचे नाले हे खाडीपर्यंत नेले नाहीत. त्यादिवशी मी प्रफुल्ल पाटील साहेबांना सांगू शकलो असतो की खाडीपर्यंत आपण नाला नेला आणि कदाचित जर भरतीचे पाणी जर आतमध्ये आले तर आपल्याला प्रॉब्लम होईल परंतु त्याचा प्रश्न विचारण्याचा उद्देश अतिशय चांगला होता की या शहरातले पाणी हे गेले कुठे असते. निघणारे पाणी कुठे गेले असते. त्यादिवशी सर्वात मोठी भरती होती तर ते पाणी कुठे गेले असते.

(सभागृहात गांधळ)

**मा. महापौर :-**

आपण सर्व सन्मा. सदस्यांनी खाली बसून घ्या.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. कर्तव्यदक्ष आयुक्त, अधिकारी कुठे गेले होते की गटारी करत होते.

**मा. उपमहापौर :-**

माझे उत्तर अजून पूर्ण झालेले नसून जोपर्यंत माझे उत्तर पूर्ण होत नाही तोपर्यंत आपण बोलू नये. माझे उत्तर पूर्ण झाल्यानंतरच आपण बोलावे. या शहरामध्ये पाणी भरले. संपूर्ण मुंबई शहरामध्ये पाणि भरले

आणि त्याच्यावरती किंवा त्या गोष्टीवरती राजकरण हे करु नका. मी माझे निवेदन करत आहे. या शहरात पाणि भरल्यानंतर मुंबईच्या अतिशय जवळ असलेले मुंबईचे लोक भाईंदरला आणि भाईंदरचे लोक मुंबईला असा प्रवास असतो आणि कामकाज असते आणि हे कामकाज असतांना या शहरामध्ये रोगराई पसरण्याची शक्यता आहे त्याच्याप्रमाणे आपल्याला लेप्टोस्पायरसचे संशयित रुग्ण सापडले, डेंग्यूचे रुग्ण सापडले आपल्या महानगरपालिकेकडून जे अतिशय गरजेचे काम आहे त सर्व चालू आहे उद्या संपूर्ण मिरा भाईंदर शहरातील सर्व डॉक्टर्स यांची सभा ग्रीन कोर्ट येथील हॉलमध्ये बोलविण्यास आलेली आहे. आपल्या महानगरपालिकेच्या डॉक्टरानबरोबर सभा बोलविली आहे या शहरात असलेला प्रत्येक डॉक्टर त्या कामी आपल्याला मदत करणार आहे आणि ह्या आजच्या सभेच्या निमित्ताने मा. शिक्षण अधिकारी आणि आरोग्य आधिकारी यांना विनंती करतो आहे की, महानगरपालिकेच्या शाळेमध्ये ९६०० विद्यार्थी आहेत त्यांना आणि त्याच्या पालकांना देखील आपण जे जे काही औषधोपचार आहेत ते दिले गेले पाहिजेत. सन्मा. सदस्य श्री. रोहीदास पाटील आपणांस विनंती करत आहे की, या पुराच्या पाण्याचे राजकरण करु नका. प्रत्येकाला बोलण्याची संधी द्या.

**रोहीदास पाटील :-**

मा. उपमहापौराची विनंती मान्य करुन.............

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, इनकी हर टाईम राजकारण करने की निती रही है। मुंबई के मुकाबलेमे हमारे एरिया हजार गुणा अच्छा रहा। हमारे यहाँ कही भी पाणी नही भरा। लेकिन इनकी आदत यह नही देखते मुंबई महानगरपालिकेने क्या किया। मिरा भाईंदर महानगरपालिकेने हजार गुणा अच्छा नाम किया। यहॉ का पाणी विभाग यहॉ बांधकाम विभाग, फायर ब्रिगेड सबको तारीफ आबिल सब लगे थे। आज यह यही भी अपने इण बीमारीयोने लडना है। बिमारी यो से लडिए। लेकिन आज मझे धन्यवाद देना था मिरा भाईंदर महानगरपालिकेने बहुत अच्छा काम किया। असके जवाबमे भारतीय जनता पार्टी और शिवसेना इस तरह की गंदी राजनीती करे यह ऐसा कही अंदाजा नही था।

**शुभांगी नाईक :-**

सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहाण जी आप ज्यादा बोल रहे है।

**(सभागृहात गोंधळ)**

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मै तारीफ करना चाहता था क्योकि सन्मा. सदस्य श्री धनराज अग्रवाल और ओमप्रकाश गाडोदियाजी मेरे साथ थे। लेकिन फिर भी यह लगे राजनीती करते है। लेकिन गलत तरकेसे हाउस को उकसाना ये अच्छी बात नही है।

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. उपमहापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी खाली बसून घ्यावे. सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील, सन्मा. सदस्य श्री. रोहीदास पाटील आपण सर्वांनी बसून घ्यावे. तसेच सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहाण साहेब आपण सुध्दा बसा.

**रतन पाटील :-**

आम्ही आपला मान ठेवतो परंतू आपण सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण यांना खाली बसायला सांगा.

**मा. उपमहापौर :-**

एकेकाने उठून बोलावे आपण कशाला पुरामध्ये राजकरण करता ज्या कल्याण मध्ये पुर आला .....

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील आपण खाली बसून घ्या. आपण सर्वांनी खाली बसून घ्या. शांतता पाळा.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, आपण त्यांना सांगा खाली बसायला.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांना अगोदर खाली बसण्यास सांगा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहीदास पाटील आपण खाली बसून घ्या.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही पूर्ण पणे तुमचा आदर करतो. आम्हाला कुणाचाही अपमान करायचा नाही.

**रतन पाटील :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो की, आजच्या सभेमध्ये अन्य महानगरपालिकेचा प्रश्न नसून फक्त मिरा भाईंदरचा प्रश्न आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहीदास पाटील आपल्या भावना ह्या समजलेल्या असून आपल्या ज्या सूचना आहेत त्या समजलेल्या आहेत तरी कृपया आपण बसून घ्यावे. सभागृहामध्ये इतर सदस्यांना बोलण्याची इच्छा असेल आणि सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांना वाटत असेल मी इतर सदस्यांना सुध्दा काहीतरी कळते तरी सन्मा. सदस्य श्री. रोहीदास पाटील यांनी खाली बसावे. एवढी विनंती केल्यानंतर सुध्दा तुम्ही खाली बसत नाही. आपणांस काही बोलायचे असेल तर परत बोला परंतू आता इतर सन्मा. सदस्यांना बोलण्याची संधी द्या. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपणांस बोलायच असेत तर आपण बोलावे.

**रोहीदास पाटील :-**

मी, दोन गोष्टी ठेवतो आणि बसतो परत उठतच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. महापौराच्या परवानगीने बोलतो आहे की, सगळया सन्मा. सदस्यांना खरोखर मी म्हणजे अगदी जनतेच्या म्हणजे बाहेर जनता जमलेली आहे बाहेर काय काय चाललेले आहे ते लोकांनी भोगलेले आहे. खरे बघायला गेले म्हणजे आपतकालीन सभा. मा. महापौरांनी लावायला पाहिजे होती स्पष्ट आहे. जी सभा लावली त्या सभेला मी होतो विषयांतर करु नका. आपण चला ठिक आहे नाही लागली. अगदी हातजोडून मी विनंती करतो की, ह्या विषया वरती सगळयानी सगळे बोलावे परंतू उगीच तुमच्या त्या वादावादी मध्ये उगाच वेळ वाया घालवू नका. आपल्या इकडे आता जी डॉक्टर साहेबांनी माहिती दिली. अगदी प्रामाणिकपणे सांगतो त्यामध्ये राजकारण करण्यात काहीही अर्थ नाही.

**आसिफ पटेल :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे आपणांस काही सुचना मांडायच्या असतील त्या मांडाव्यात. आरोप प्रत्यारोप केले तर ते आम्हाला सहन होणार नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

अहो, मी मांडत आहेत तुम्ही बोलत असतांना मी कधी उठलो का? तुम्हांला कसे कळले की, मी आरोप करत आहे? मा. महापौर मॅडम, हे बरोबर नाही. आम्हाला बोलायला द्या. सत्तेसाठी हे सर्व काही सहन करावे लागते.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, मा. महापौर, मा. उपमहापौर २६ तारखेला हे सारखे धावपळ करीत करीत त्या वेळेला सन्मा. सदस्य श्री. रोहीदास पाटील हे कुठे होते? ज्यावेळी २६ तारखेला पूर आला त्यावेळी त्यांचा पत्ता नव्हता. मा. महापौर, उपमहापौर तसेच संबंधित अधिकारी, नगरसेवक हे रात्रंदिवस धावपळ करीत होते तेव्हा तुम्ही कुठे होता? तुम्हांला ज्या काही सुचना करावयाच्या त्या कराव्यात. कल्याणमध्ये जास्त नुकसान झाले तिथले तुम्ही काही एक बोलत नाही. इकडे सत्ताधारी काम करतात तरी तुम्ही राजकारण करु नका फक्त सुचना मांडा.

**(सभागृहात गोंधळ)**

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, सुरुवातीला सन्मा. सदस्य आसिफ पटेल यांनी सभा सुरु असतांना जे सांगितले तेच माझे विचार आहे. सन्मा. सदस्य श्री. आसिफ पटेल साहेब जरा शांत राहून ऐकून घ्या. पाउस आता पडला जी काही आपत्ती झाली ती आता झाली. गेल्या सहा महिन्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याच्या गोडाउनची दुरावस्था आपल्या कोणी नगरसेवकांनी बघितलेली आहे का? मी स्पष्ट सांगतो आहे की, पाउस हा आता पडला. मोठे मोठे टपोरे थेंब पडले. भरपूर पर्जन्यवृष्टी झाली आहे. आपल्या गोडाउनमध्ये कसलेही औषध सहा महिन्यापासून नाही. तिथे जाउन जरा रेकॉर्ड चेक करा. आता गव्हर्नमेंटने जी २२५ पोती पावडर दिली, जी ढोरं तुमच्या एरियात कुजत पडलेली आहेत जी घाण साचलेली आहे त्यामुळे डेग्यू, मलेरिया जे काही आपण बोलत आहोत लेप्टोस्पायरसपासून सगळे त्याच्याकरिता महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंटने २२५ पोती पावडर तुम्हाला दिली. आपल्या इकडच्या अधिकाऱ्याच्या दरिद्री, कर्मदरिद्रीपणामुळे ती पोती भिजलेली आहेत आणि लगदा झालेला आहे. मी काय कोणावर आरोप करीत नाही. आज जर ती पावडर असती तर त्याच्यातील २५ गोणी ही तुम्हाला मिळाली असती. मला २५ गोणी मिळाली असती. ती २२५ गोणी पावडर ओली होउन गोडाउनमध्ये पडलेली आहे जरा जाउन बघून या. जे डॉक्टर साहेब मोठया मोठया गोष्टी करतात गेल्या तीन महिन्यांपासून सांगत आहे की, बायर इंडियाची चांगली औषधे आणा. आपण करोडोने यांना पैसे देत असतो. सर्व नगरसेवक आणि सन्मा. सदस्य आसिफ पटेल साहेब, लोक चपलेने तुम्हालाही मारतील आणि मलाही मारतील. बाहेर डॉक्टर बावस्करांना कोणीही ओळखत नाही. काशीगावामध्ये डॉक्टर आणि तुम्ही जर एकत्र फिरलात तर शंभर सलाम हे तुम्हाला पडतील आणि तुम्हाला विचारतील यह नया नल्हा कौन है, समझे क्या. आज भाईंदर मे घूमेगा तो हमको सलाम होयेगा और डॉक्टर साहब को कोई पहचानता नही। वैसे पब्लीक पहले हमको मारेगी, वह बिचारे को मारेगी नही। गोडाउनमध्ये साहेब आपल्याकडे अजूनही तुम्हाला सांगतो गव्हर्नमेंटची जी पावडर आलेली होती ती भिजलेली आहे आपली चूक काय झाली ती बघा. जे आपण कर्मचारी पाठविले त्याच्याकडे प्लास्टिकच्या ताडपत्र्या वगैरे काही दिल्या

नाहीत आणि जे ट्रक गेले ते सुध्दा उघडे गेले. जी आपल्याकडे आपत्कालीन करिता पावडर आलेली होती ती सर्व फुकट गेलेली आहे त्यानंतर आज बहूतेक सर्व ठिकाणी महामारी जे काही आहे ते आणखी पुढे होणार आहे आणि ही महामारी होत असताना तिला थांबविण्याकरिता श्री. शिवमुर्ती नाईक साहेब होते. त्यांनी त्यावेळी बायर इंडियाची औषधांबाबत सन्मा. उपमहापौर वैती साहेब, तुम्ही माझ्याबरोबर स्थायी समितीला होते ते दिवस आठवा त्यांचा डेमो झाला होता. बायर इंडियावाल्यांनी स्वतः ती फ्रीमध्ये औषधे मारण्याबाबत आपल्याला आश्वासन दिले होते. त्यानंतर व्यक्ती बदलली, पद बदलले आणि खुर्चीसूध्दा बदलली लगेच सगळया त्या सिस्टीममध्ये बदल आला. परत बायर इंडियाची चांगल्या प्रतिची हायर क्वालीटीची औषधे जाणुन बुजून ह्या महापालिकेत कधीही आणली गेलेली नाही आणि आजही गोडाउनची ती परिस्थिती आहे. स्पष्ट सांगतो आहे. उंदरांमुळे लप्टोस्पायरस आपल्याला होतो. तर उंदीर मारण्याकरिता भाईंदरमधल्या निकृष्ट दर्जाच्या कंपनीच्या केकच्या वडया आणलेल्या आहेत, डॉ. बावस्करांच्या बर्थडेच्या. लक्षात घ्या, बायर इंडिया तेच औषध देते परंतु एक केक खाल्यानंतर उंदीर लगेच मरतो. आपल्या इकडे प्रॉडक्ट त्यांची काहीही गॅरंटी नाही. माझ्याकडे मी तीन दिवसांपासून ते केक टाकत आहे, तर ते उंदीर डॉ. बावस्करांच्या नावाने दोन पायांवर नाचत आहे कळलं का? ही परिस्थिती आहे. ही सत्य परिस्थिती आपल्याला नाकारता येत नाही. प्रत्येक बायर इंडियाचे औषध आपल्याकडे पहिल्यांदा वापरलेले होते. त्यांनी आपल्याला एक सर्व्हिस चांगली दिलेली होती. ही सगळी सर्व्हिस ती औषधे महागडी आहेत परंतू चांगले आहे त्याच्यात कमिशन मिळत नाही म्हणून ते सर्व ब्रेक्स झाले, त्या ऑर्डर तोडल्या आणि आजही आपल्या गोडाउनमधली खस्ता हालत ती आहे. आता आज संध्याकाळी पाउस येणार नाही याची आपण काय गॅरंटी देउ शकतो? सांगा मला, तुमच्याकडे सफाई कर्मचारी आहेत त्यांना अजुनही गमबुट मिळालेले नाहीत, त्याच्याकडे अवजारे नाहीत, त्याच्याकडे रेनकोट नाहीत तरी आपण जेव्हा फोन करून बोलावतो की, हमारे इधर दस आदमी भेज दो। जो आनेवाला है उसको लेप्टोस्पायरस होयेगा की, नही उसको देखो। मान गया तो उसको छोडनेवाला नही है। तो सफाईवाला मजदूर भी मर गया ना तो उसका जिम्मेदारी यह कमिशनर पहलेका जो गया और अभी जो नया आया है उसका है। सब नगरसेवकोंको उनका अभिनंदन करनेकी घाई है। आज जो रोते है जो कमिशनर आके बैठते थे और मेरा शहर का क्या हाल है वो पहले देखने दो और बादमे में मंत्रालय जाउंगा अभी तक आया हुआ ऑफिसर नही है। यह सभा अभी सव्वा एक महिने तक लगने वाली है। आपके चीफ ऑफिसर कुछ मंगता है कि मेरे नगरसेवक क्या बोल रहे है और मेरा डिपार्टमेंट कहॉ है। समझ मे आया की नही। मराठीत बोलतो हे सर्वांना कळते. आपल्या नविन कमिशनर साहेबांचे कर्तव्य होते की, आज आपली पहिली मिटींग आहे कमीत कमी मिटींगला एक तास बसतो, नगरसेवकांच्या सर्व व्यथा ऐकतो आणि मग मी माझ्या पुढच्या कामाला जातो. परंतु तसे झालेले नाही आज प्रत्येक गोडाउनची परिस्थिती मा. महापौर आपल्याला हात जोडून विनंती करतो की, या भाईंदर परिसरातल्या सगळया पोलीस स्टेशनच्या ए.डी.आर. तपासा. ए.डी.आर. म्हणजे काय असते आमच्या घरामध्ये एखादा मृत्यू झाला किंवा एखादा आमचा नातलग, नातेवाईक आजारी पडला किंवा शेजारीपाजारी म्हणा तर त्याला पटकन उचलून आम्ही हॉस्पीटलला नेतो. काहीही असो आणि तिकडे तसा मृत्यू होतो आणि त्या दिवशी आमच्याकडे नउ डब्याच्या गाडया गेल्या भाईंदरला तर माझ्या सोसायटीतला एक मुलगा पडला आणि त्याचा पाय तुटला. त्या दिवशी मी भगवतीला पाच वाजेपर्यंत होतो तरी तिकडे तीन केसेस आपल्या इकडच्या झालेल्या होत्या. अहो हे डॉक्टर साहेब बोलतात ते इकडचे बोलतात. भक्ती वेदांतमध्ये मा. वैती साहेब, आमच्या वार्डमधून नायर म्हणून एक मेला त्याच्या आदल्या दिवशी त्यांना बोलले की, साहेब तो मेला आहे त्याला आपण बघायला जा. त्यांनी उत्तर दिले की, याचे उत्तर मी तुम्हाला उद्या देईन. कसले आले हो हे. एक ऑफिसर गेला आता कल्याण डोंबिवलीला आणि बाकीची सर्व पिलावळ टाका. त्याशिवाय तुमचे हे होणार नाही जे जिकडे जाते ना गाई बरोबर वासरु जाते तशातला हा प्रकार आहे घालवा ह्या वासरांना काहीही होणार नाही. ह्या डॉक्टर साहेबांबद्दल जे काही सन्मा. नगरसेवक बोलत होते आपल्या इकडे तीन ते सहा महिन्या अगोदर तुमच्या प्रत्येक सत्ताधारी नगरसेवकांनी त्याच्यावरती भाषणे केलेले आहेत त्यांची मिनिट आमच्याकडे आहेत हे विसरु नका. एकीकडे एकदा बोलायचे, निषेध करायचा, टीका करायची, आरोप प्रत्यारोप करायचे आणि परत स्थायी समितीला सहा महिन्याची मुदत वाढ द्यायची हे धंदे आपणच केलेले आहे. हे पाप आपलेच आहे लक्षात ठेवा. आता कशाला उगीच बोलता. तुम्ही केलेले आहे आणि तुम्ही आणलेले आहे. तुम्ही त्याला वाढवले.

**आसिफ पटेल :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे, आपण सुध्दा स्थायी समितीला होते.

**मिलन म्हात्रे :-**

महत्वाचे जे काय आहे तेच बोलत आहे. पोलिस स्टेशन आपल्या इकडचे जे आहेत ते डेथ आहेत ते कशामुळे झालेले आहेत. माझ्या एरियात दोन लेप्टोस्पायरसचे रुग्ण मिळाले तर त्याचे प्रिकॉशन आपण घेतले पाहिजे. पुढचे दोनचे वीस झालेले नको पाहिजे. यामध्ये कुठलेही राजकारण नाही. मरणाचे काही सांगू शकत नाही, मी बाहेर जाईन आणि कुठेतरी पाय पडेल आणि मी मरु शकतो. कसले राजकारण करत आहात. त्या

दिवशी साप चावलेला मुलगा भगवती हास्पीटलमध्ये आणला तो सन्मा. सदस्य माळी साहेबांच्या वार्डमधील आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, आता हे सर्व झाल्यानंतर श्री. राम नाईक साहेब हे हा जो सगळा हादसा झाला याचा दौरा करायला आले तेव्हा त्यांनी आपल्या महानगरपालिकेला भेट दिली त्यावेळेला मा. आयुक्त साहेबसुध्दा हजर होते तसेच सन्मा. सदस्य रोहिदास पाटील सुध्दा हजर होते. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी श्री. राम नाईक साहेबांसमोर सांगितले की आपल्या महानगरपालिकेकडे आजसुध्दा पाव किलो टि.सी.एल. पावडर नाही. सन्मा.सदस्य श्री. रोहिदास पाटील आपण मला प्रथम बोलु द्या. श्री. राम नाईक साहेब हे समंजस माणूस आहेत त्यांनी सांगितले की ताबडतोब जी काही सत्य परिस्थिती आहे तीच मांडा. मी चुकून त्या मिटींगला बसलेलो होतो. तेवढ्यात ही लोक आले आणि मी तेथेच होतो. त्यानंतर त्यांनी सांगितले तुम्ही पावडर चेक करुन त्या दिवशी तुम्ही जे वक्तव्य केले हे सर्व मी स्वतः बघितले आहे. त्या गोडाउनच्या इकडे ६०-७० बॅगा होत्या आणि प्रत्येक टाकीवरती टि.सी.एल. पावडर हे वाटले जाते आणि तुम्ही अशी आपली बेइज्जती करायची का? केंद्रीय मंत्री यांच्यासमोर तरी हे काय चाललेले आहे आणि तुम्हीसुध्दा एक सन्मा. नगरसेवक आहात पार्टीच्या दृष्टीकोनातुन आपण एक नगरसेवक आहात याबाबत सन्मा. सदस्य आपण वक्तव्य करतात हे सर्व काही खोटे आहे. तुम्ही आरोप प्रत्यारोप जरुर करा हा तुम्हाला अधिकार आहे परंतु लोकांसमोर बेइज्जती महानगरपालिकेची कराल. परंतु त्याबाबत महानगरपालिका ही अजून सक्षम आहे की त्यांच्याकडे टि.सी.एल. पावडर पाव किलोसुध्दा नाही. अहो करोडो रुपयाचे आपण बजेट करतो दुसरी एक गोष्ट आहे मी वेळेला काही बोललो नाही परंतु सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब असे आपण कधी करु नये. दुसरी गोष्ट आता आपल्याकडे औषधे आहेत. डॉक्टर साहेबांना विनंती केलेली होती की जे टि.बी. चे पेशन्ट आहेत तर त्याच्याकरीता महागातील महाग अशी औषधे आपण मागवा त्यास शासन पैसे देईल परंतु तुम्ही ते आणा. मा. महापौर मॅडम मी तुमच्याकडेसुध्दा दोन टि.बी. चे पेशन्ट घेउन आलेलो होतो पण आपल्याकडे जे एम.डी. आणि एम.बी.बी.एस. डॉक्टर आहेत त्यांच्याकडे मी जे दोन पेशन्ट घेउन गेलेलो होतो त्या पेशन्टला मी स्वतः दोन महिने दोन चार वेळा औषधे दिलेली आहेत. डॉक्टर साहेबांनी स्वतः सांगितले की सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांनी ती औषधे दिलेली आहेत ती मी माझ्या पैशाने दिलेली आहेत. परंतु आपली औषधे ती पास करीत नाही. डॉक्टर सांगतात की, ही औषधे घ्यायची नाही परंतु जी निकृष्ट दर्जाची औषधे आहेत ती आणता कशाला? आपली महापालिका सक्षम आहे. तरी माझे म्हणने ऐवढेच आहे की याच्यापुढे जी काही औषधे आणणार ती चांगल्या दर्जाची आणावीत. कारण त्यामुळे तो पेशन्ट हा दोन दिवसांत बरा व्हायला पाहिजे. अशी प्रत्येकाची भावना असते तरी आमचे हेच म्हणने आहे की तुम्ही टी.बी. चे पेशन्ट भाईंदरमध्ये इतके वाढत चाललेले आहेत की त्याच्यासाठी काहीतरी महानगरपालिकेला मा. महापौर मॅडम, तसे तुम्ही आदेश द्या. की जे चांगल्या प्रतीचे जे औषधे असतील ती तुम्ही मागवायची. दुसरी गोष्ट सन्मा. सदस्य रोहिदास पाटील एवढा मोठा जो हादसा झाला त्यावेळी चार भांडी वाटली परंतु आम्ही, आमच्या नगरसेवकांनी स्वतःच्या पैशानी वाटली आणि ते सर्व काही पेपरला आले आहे तसेच टि.व्ही ला पण दिलेले आहे.जे आम्ही केलेले आहे ते आलेले आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील साहेब आपण ऐकुन घ्या. आपण जरा खाली बसून घ्या. सन्मा. सदस्यांना विनंती करण्यांत येते की जरा शांत बसा.

**(सभागृहात गोंधळ)**

**गजानन भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की आम्ही जे काही वाटले ते आम्ही बोलून दाखविले नाही.

**रक्षा शाह :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटीलजी स्वतः राजकारण करता ते सांगत नाही. महानगरपालिकेचे पाण्याचे टॅंकर जेव्हा आमच्याकडे आलेले होते की ते टॅंकर मिलन पाटीलने आणलेले आहे आणि त्यावेळी मी तिथे थांबलेली होती आणि मी सांगितले की हे पाण्याचे टॅंकर महानगरपालिकेतर्फे आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. उपमहापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की जी रोगराई संबंधीची परिस्थिती निर्माण झालेली आहे त्याच्यावर आपल्याला काय उपाययोजना करता येईल आपल्याला इतर ज्या महत्वाच्या गोष्टी बोलायच्या आहेत किंवा सुचना करावयाच्या आहेततसेच आजची मा. महासभा आहे, महासभेपुढे महत्वाचे विषय आहेत परंतु या विषयावरती अतिरिक्त काही बोलायचे असेल तर त्याबाबत आपण तसा लेखी प्रस्ताव द्या. आरोग्य विर्षयक आपल्याला जे जे काही करता येण्यासारखे असेल त्यासाठी आपण बांधील आहोत. आपले प्रस्ताव लेखी द्या. परंतु आपली जी सुचना आहे ती बहुमुल्य सुचना आहेत येथे सर्व काही तज्ञ लोक बसलेली आहेत. दोन दोन मिनिटात आपली लेखी सुचना देण्यांत यावी.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आम्ही सुचना लेखी बऱ्याच वेळेला दिलेली आहे. आम्ही आता बोलत आहोत.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, दोन मिनीटे बोलू इच्छितो. २६ और २७ तारीखको जो नुकसान हुआ है उसमे नागरिकोके साथ साथ टोटल व्यापारी सबकी दुकान जो नीचे है, तळमजले पर सबकी दुकान है, टोटल व्यापारीयोंको मालका हजारो और लाखो रुपयोंका नुकसान हूआ। और उसका भी सर्व्हे किया हूआ लेकीन उसके बारेमे किसीने कुछ भी नही कहॉ है। टोटल व्यापारियैंका जीना, खाना, पिना बंद हूआ है। इन्श्युरन्स सबका है की नही भी है लेकीन उनको जो दाखला चाहिए वह दाखला लेनेके लिए उनको बीस-बीस चक्कर लगाने पडते है। दाखला की कोई व्यवस्था नही है। दाखला कौन देगा। आप प्रभाग समितीको बोलिए की वह दाखला वहॉपे उपलब्ध करायें यह सुचना मेरी है।

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. धनराज अग्रवालजी या विषयावरती आत्तापर्यंत याबाबत सर्व्हे करण्याचे काम महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना जरी नेमलेले असले तरी सर्कलच्या हाताखाली जे तलाी आहेत आणि त्या तलाठ्याच्या सुचनेप्रमाणे आपण वेगवेगळे गट बनवून जे ८५४१ सर्व्हे केलेले आहेत. दोन पाच दहा टक्के घ्यायचे राहीले आहेत ते चालु आहे. ज्या-ज्या कमर्शियल गाळ्यांमध्ये म्हणजेच कंपनीमध्ये पाणी गेले असेल किंवा दुकानांचे नुकसान झाले असेल तरी त्यांचासुध्दा आपण सर्व्हे करुन घेतलेला आहे. शासनाकडून पहिल्यांदा जे आदेश निघाले होते त्याच्यामध्ये मृतांसाठी एक लाख रुपये, जखमींसाठी पंचविस हजार रुपयें अशा प्रकारे होता परंतु अचानक शासनाने नंतर ज्या-ज्या घरात पाणी गेले आहे त्या-त्या घरात माणसी एक हजार प्रमाणे जास्तीत-जास्त पाच हजार रुपये अशी मदत जाहिर केली आणि दहा किलो अन्नधान्न गहू, तांदूळ तसेच ज्यांच्याकडे गॅस नव्हता अशांना १० लिटर केरोसीन अशा प्रकारे पॉलिसी जाहिर केली होती. मिरा भाईंदरमध्ये मिळाली म्हणून आपले ते प्रयत्न होते आणि व्यापाऱ्यांनादेखील मिळावेत असे प्रयत्न होते परंतु काल दुर्दैवाने मा. कमिशनर साहेबांची बदली झाली. तशीच बदली ठाण्याचे तहसीलदार मुंडेराव साहेब यांची बदली झाली आणि त्यांच्या जागी श्री. झळकेराव साहेबांची नियुक्ती झाली तरी मी त्यांच्याशी बोललो. तसेच या विषयाबाबत माझे निवेदन मी पालकमंत्री यांनासुध्दा दिलेले होते. व मा. कलेक्टर साहेबांशी देखील मी बोललो होतो परंतु अजूनपर्यंत व्यापा-यासाठी कुठलीही योजना जाहिर केली नाही. परंतु ज्यांचे नुकसान झालेले आहे आणि त्यांचा सर्व्हे करायचा आहे. आणि त्यांच्या सर्व्हेचे कामदेखील तलाठी मार्फत चालु आहे. आणि त्याची जी काही डिस्पनलसरी ऑर्डर आहे ते महापालिका जरी देणार असली तरी तलाठीच्या मार्फतच आपण देऊ.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब चालेल, परंतु किती लोकांचा विमा हा केलेला आहे. पुरामध्ये सर्व काही वाहून गेले आणि ते धान्य खराब झाले ते आपण फेकुन दिले तर आता डंपिंग ग्राऊंडवरती त्यांनी ते धान्य फेकून दिलेले आहे तर ते रिपोर्ट कोणीही देत नाही. विम्याच्या राशीत मा. तलाठीचा काहीही मतलब नाही.

**मा. उपमहापौर :-**

याबाबात संबंधित व्यक्ती ज्या आहेत ज्यांना ज्यांना जे काही बाधीत व्यक्ती आहेत त्यांनी डॉ. बावस्करांशी तातडीने संपर्क साधावा.

**शरद पाटील :-**

जे काही आता सर्व्हे केलेले आहेत आणि काही लोकांना पैसे वाटप केले गेले आहेत आणि या शहरात असे काही सन्मानित लोक आहेत त्यांनी ज्या वॉर्डातुन लोक दुसरीकडे जातो त्या माणसाला सांगितले आहे की नगरसेवककडे पाच-पाच लाख रुपये दिलेले आहेत अशी अफवा पसरलेली आहे. असे याच सभागृहातील जे सन्मानित लोक आहेत त्यांनी ते सांगितलेले आहे. आणि आता जे तुम्ही सर्व्हे केलेले आहेत त्याचे फॉर्म भरलेले आहेत त्यांना पैसे मिळतील किंवा नाही याबाबत फक्त मला उत्तर द्या.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, अभी जो सर्व्हे हो रहा है और उसका कुछ सर्व्हे बाकी है वह बाकी लोगोंका आग्रह है की हमारा सर्व्हे किया जाए। लेकीन उनका सर्व्हे जब हम ऑफिसर लोगोंको बोलते है तो वह बोलते है की हम लोगोंको कल्याण और डोंबीवली भेजनेकी बात चल रही है, तो ऐसा नही होना चाहिए क्यैंकी जब तक मिरा भाईंदर का सर्व्हे पुरा नही होता है तब तक हमारे कर्मचारी यही रवाना चाहिए।

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल याबाबतच सांगतो की काळच मी मा. तहसीलदार साहेबांशी बोळले की आर. डी. शिंदेशी बोललो आर. डी. शिंदे, श्री. भिसे साहेब आणि आपल्या मिरा भाईंदरचे ज्यांच्याकडे कंट्रोल आहे त्या सातपुते मॅडम तहसीलदार ऑफीस त्यांच्याशी मी बोललो आणि त्यांना सांगितले तसेच कालपर्यंत जे कमिशनर म्हणून काम पाहत होते त्यांनी स्वतः देखील नंदकुमार जंत्री साहेब कलेक्टर यांच्याशी बोलले आणि या विषयात मा. पालकमंत्री गणेश नाईक साहेब यांना मी आणि स्थायी समिती सभापती मोहन पाटील साहेब यांनी सविस्तरपणे निवेदन हे लेखी दिले होते. काल आम्ही एकत्र राहून फोन करुनसुध्दा

सांगितले आणि तसे आदेश दिले आहेत. आपले ऐंशी लोकांची मागणी इतर शहरासाठी केलेली होती ज्या शहरामध्येसुध्दा पाणी हे भरलेले होते तेथेदेखील रोगराईचे प्रमाण हे वाढलेले आहे. व त्यावेळी सर्कल साहेबांनी काय सांगितले की तिथे आपल्याला फक्त कशा प्रकारे वाटप करायचे याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. त्यावेळी मी सांगितले की आमचे जे शिपाई, सफाई कर्मचारी आहेत तेदेखील पाच हजार रुपये मोजू शकेल. तोसुध्दा दहा किलो तांदूळ, गहू तोलून देऊ शकेल. त्यामुळे ह्या कर्मचाऱ्यांना अशी काही ट्रेनिंगची गरज नाही. कर्मचारी कुठल्याही परिस्थितीत आमचे शहर सोडून जाणार नाही असे आपण सांगितलेले आहे. ज्या लोकांचा सर्व्हे झालेला नसेल आणि ज्यांची सर्व्हे होण्याची इच्छा आहे तरी त्या त्या परिसरात जे प्रभाग अधिकारी आहेत त्या प्रभाग अधिका-यांना सांगा त्या क्षेत्रामध्ये, त्या इमारतीमध्ये, त्या कॉम्प्लेक्समध्ये किंवा त्या गल्लीमध्ये जो कर्मचारी महापालिकेचा सर्व्हे करण्यासाठी गेलेला असेल तोच कर्मचारी सर्व्हे करुन घेईल. ही मदत देण्यासाठी आपण जे प्रयत्न केले इनफॅक्ट काल तर मी असे बोललो आणि मग मा. आमदार मुझफ्फर हुसैन साहेबांशी बोललो आणि मग त्यांनी सदर बाबत मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेबांना फोन केला आणि त्यांना पत्रदेखील फॅक्स केले. आणि एकावेळी मिरा भाईंदर शहरातील लोकांवरती जाणीवपूर्वक अन्याय केला जात आहे किंवा काय? मी जेव्हा तहसीलदार कार्यालयाला फोन केला त्यावेळी तहसीलदार आणि तलाठी समोर होते. त्यांच्यासमोर मी सांगितले की आपले तलाठी आणि सर्कल हे जाणीवपूर्वक आमच्या शहराला मदत देत नाही. सर्कल सांगतो की आपल्या शहरासाठी पैसे दिलेले नाही परंतु काल माझे जे बोलणे झालेले होते आणि झलकेराव साहेब, तहसीलदार यांनी आश्वासन दिलेले होते की उद्या ११.३० ते १२ वाजेपर्यंत आपल्याकडे मदत वाटपाचे काम सुरु केले जाईल अशा प्रकारे सांगितले. ज्यांचा सर्व्हे झालेला नाही त्यांचा सर्व्हे होऊन आणि अशी कोणी ही गोष्ट समाजात पसरवलेली असेल की याला नगरसेवकांकडे पाच-पाच लाख रुपये हे दिलेले आहेत तरी असा कुठलाही प्रकार नाही. जे पैसे दिले जातात ते तलाठ्याच्या आधीन राहून आणि हे देताना तो नक्की तेथे राहतो का? शिवाय ज्याला मदत केली आहे त्याच्याकडून दोन पावत्या घेतल्या जातात. शिवाय त्यांनी असेही ठरविलेले आहे की अटीशर्तीमध्ये त्याचे रेशनकार्ड असले पाहिजे किंवा त्याचे मतदार यादीत नांव हे असले पाहिजे. परंतु त्याच्यापूढे एक ओळ ॲड केलेली आहे की यासाठी सक्ती असू नये. परंतु आज मदत ही सुरु होणार होती मी तेथुन फोन लावतो आहे परंतु सर्कल साहेबांचा फोन हा लागत नाही. याबाबत अधिक माहिती आल्यास आपणास ती कळविण्यात येईल.

**धनराज अग्रवाल :-**

जहॉ भी पूर आता है वह नॅचरली आता है लेकिन उसके लिए महापालिकाओके पास क्या व्यवस्था है। उस दीन, २६, २७ जुलै तारीखको महापूर आया। आनेके बाद लोगोंका सामान, बर्तन सबकुछ बह गये, लोग भुखे बैठे थे। महापालिकाका कोईभी अधिकारी और आप लोग उनकी व्यवस्था नही कर सके। इतना अधिकार आपको नही है क्या। सभी सामाजिक संस्थाओने हर लोगोको वहॉपे खाना भिजवाया। लेकिन मा. महापौर, मा. आयुक्त दोनो सिर्फ घुम रहे थे। और उन्होने किसीने नही कहॉ की इनको खाना देना चाहिए।

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल साहब उस बारेमे जिस-जिस क्षेत्रमे ऐसी बात आयी तो जहॉ खाना देना जरुरी है वहॉ-वहॉ इस्कॉनके माध्यमसे खाना देते गये यह बात आपको यह बात आपको बोलना चाहता हु। जिस २६ तारीख बारीश होने के बाद उा दिन शाम जब मै कमिशनर साहब को मिला था जहॉपर हमारे फायर ब्रिगेडके डिपार्टमेन्टने तकरीबन ८५ लोगोंको पाणीमेसे पकड पकडकर लाये थे। लाईफ जॅकेट पहनकर लोगोंको पकडे थे और जहॉसे एक लडका बहके गया था वहॉपर कमिशनरभी आये थे। मा. महापौर मॅडम, प्रभाग अध्यक्ष वहॉपे थे। और वहॉके संबंधित नगरसेवक उपस्थित थे और गावठण जहॉसे ११ घर बह गये और काफी घरोंमे दरारे भी गयी ऐसी जगहपे तुरंत पुलिस स्टेशनको पहले बोला की यहॉके लोगोंके लिए खानेकी व्यवस्था किजिए। मैने कमिशनर साहबसे बात की थी तो उन्होने इस्काम्नको आदेश दिये। जहॉ मिनाक्षी नगर और भराचा पाडा जहॉ सन्मा. सदस्या ज्योत्स्ना हसनाले मॅडम वहॉ हम लोग गये थे तो उसने बोला की यहॉ के लोगोंको खानेका प्रबंध नही है मैने कही पे बात की है तो उन्हाने वेस्टर्न हॉटेल बात की तो कमिशनर साहबने तुरंत उनके खानेकी व्यवस्था कर दी गयी थी। उसके लक्ष्मीबाग यह दो बार डूबा। २६ तारीखको लक्ष्मीबाग दो बार डूबा था उनके एकभी घरपे अनाज पकाने कुछ नही बचा था, उनको दाराका ढाबेमेसे पाच दिन तक खानेकी व्यवस्था किया गया। ऐसी जहॉ जहॉ वडापाव जैसी व्यवस्था की गयी थी। ठीक बारीशके दुसरे दिन २७ तारीख को आप लोगोंकी, हमारी कमिशनर साहबसे मुलाकात इस कार्पोरेशनके दरवाजेपे हुई थी। ऐसे कोई नही घूम रहा था। सब प्रतिनिधी अपने अपने क्षेत्रमे अपने अपने हिसाबासे काम कर रहे थे। सामाजिक संघटनके लोग हमेशा अपने योगदान देनेके लिए तैयार रहते है। वो बिना बोले देते है। कोई बोलके देता नही।

**धनराज अग्रवाल :-**

इसलिए मै बोलता हू की हमारी महापालिका सक्षम है और महापालिकाका बहूत बजेट है, आप वो बजेटमेसे ऐसी कछ ना कुछ सहायता आप कर सकते है लेकिन उस समय महापालिका असहाय नजर आयी। अगर वो बाटेगे तो चलेगा और हम लोगोके पास कुछ नही ऐसा नही होना चाहिए था। दुसरा आपको बता रहा हू की महाजनवाडी जो अपने अभी बताया तो महाजनवाडीमे जो नाला था वो नॅच्युरल नाला आपको

मालूम होना चाहिए की २५ फुट का था औश्र उसको १० फुट का किसने किया और चाळ अथवा इमारत बांधनेकी परमिशन उनको किसने दी। और वह इमारतोमे नल भी लग गये। और लाईट भी चालु हो गयी। और अभी उनको जो बिल्डर अभी यहॉसे भाग गया वह यहॉपे नही है तो उसके उपर कारवाई करनी चाहिए।

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. धनराज अग्रवालजी मै आपको बताता हू की पशुपतीनाथ बिल्डर्सके नामसे उनका बोरीवलीमे ऑफिस है। उनके शुक्ला, पांडे ऐसे चार पार्टनर है उनपर महापालिकाने एम.आर.टी.पी. ॲक्ट तहत कारवाई की है यह सम आज नही बने हूए है वह दस साल पहलेसे बने हूए है, बनानेका निर्माण करनेका काम चालु है। इमारत नही बनी थी सिर्फ चाल ही बनी हूई थी। और जो नाला है वह नाले को डायवेंट किया जिस वक्त यह घटना घटी उस वक्त मा. महापौर मॅडम, मै और कमिशनर सीब गये हूए थे तो उन लोगोने कहॉ था की यहॉ जो नॅच्युरल नालेको प्लोट था वो पिछे भी एक नाला था वह मुंबई की तरफ उतर रहा था लेकिन वह नाला बंद कर दिया है और संजय गांधी उद्यान उन लोगोने वहॉसे कोई भी काम करने नही देते। तो उसी वक्त पुलिस और मा. कमिशनर साहब हम लोगोंकी जॉईन्ट मिटींग हूआी भी बात हूई और उस तरकीबसे उसकी सहायता के लिए वहॉ जितने लोग रहते है उनके सबके हस्ताक्षर करके पुलिस स्टेशनमे ऐसा लेटर दिया हुआ है और उसके उपर एम.पी.डी.ऐ. ही लग जायेगा ओर कारवाई भी होगी। इसके लिए आप लोग जो जो सजेशन देंगे वह सजेशन पर अंमल किया जायेगा।

**शिवप्रकाश भुदेका :-**

इसके अधिकारी ही जबाबदार है। वह क्या एक रात मे थोडी खडा हूआ है, वह क्या फिल्मी सेट थोडी है की एक रातमे खडा हो जाये और खत्म हो जाये ऐसा तो नही है। बिना अधिकारी के मिलीभगतसे थोडी ऐसा होता है। जिस अधिकारीने बनाया हूआ है उसके उपर कारवाई होगी की नही।

**(सभागृहात गोंधळ)**

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, मी येथे उभी आहे. महाराष्ट्र शासनाचा पैसा आला होता तर काही नगरसेवकांनी बस्तान बांधून स्वतः असे ठरविले की मी स्वतः पैसे वाटतो आहे तरी हे कितपत योग्य आहे? याबाबत मला उत्तर द्या आणि जर तसेच असेल तर प्रत्येक प्रभागात तीन नगरसेवक आहेत त्या सर्वांना सोबत घेवून पैसे वाटायला सुरुवात करा. हे योग्य नाही.

**मा. उपमहापौर :-**

अहो मॅडम अजून पैसेच आले नाहीत आणि असे कुठल्या नगरसेवकांनी सांगितले, त्यांची नांवे तरी सांगा की पैसे कुठून आले ते तरी आम्ही विचारु.

**शुभांगी नाईक :-**

आम्ही शोधून काढण्यापेक्षा आपणच त्यांना शोधून काढा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, नैसर्गिक आपत्तीमुळे बाधा पोहचलेल्या व्यक्तींना मदत देणेबाबत आपल्याला कल्पना असेल की दि. २६ व २७ जुलै रोजी संपूर्ण महाराष्ट्रात जी नैसर्गिक आपत्ती आली आणि त्यामुळे सर्व ठिकाणी जिवित व वित्तहाणी फार मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. आपल्या परिसरात देखील अनेक लोक हे बाधीत झालेली आहेत. सन्मा. सदस्य श्री. धनराज अग्रवाल आणि सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील यांनी या ठिकाणी भावना व्यक्त केल्या त्यांच्या भावनेशी मी सहमत आहे. आपल्या तलाठी यांच्यामार्फत जे पैसे वाटप केले जात होते अद्यापही काही ठिकाणी पैसे पोहचलेले आहेत आणि काही ठिकाणी पैसे हे पोहचलेले नाहीत तरी आपले प्रभाग अधिकारी जे आहेत चारही प्रभागाचे अधिकारी, त्या प्रभाग अधिका-यांनी सर्व्हे हा केलेला आहे परंतु त्यांचा सर्व्हे आणि तलाठी यांचा सर्व्हे यांच्यामध्ये तफावत आढळून येते तरी व्यवस्थितपणे अजूनपर्यंत लोकांना मदत ही पोहचलेली नाही. ज्याप्रमाणे मा. उपमहापौर यांनी सांगितले की केरोसिन आणि तांदूळ हे अजिबात पोहचलेले नाही. आमच्या प्रभागात फक्त गहूच पोहचलेले आहे. तांदूळ आणि रॉकेल हे अजूनपर्यंत पोहचलेले नाही. पैशाची मदतसुध्दा अजूनपर्यंत पोहचलेली नाही. तरी ज्या लोकांच्या घरात म्हणजे शहरी आणि ग्रामीण असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करण्याचे आदेश राज्यशासनाने दिलेले आहेत. मा. पालकमंत्री साहेबांनी दिलेले आहेत परंतु आपल्या ठिकाण ज्या ज्या लोकांच्या घरात पाणी शिरलेले आहे अशा ठिकाणचा अद्यापही सर्व्हे हा झालेला नाही. त्यामुळे त्या लोकांना शासकिय मदत अद्यापही मिळाली नाही त्याबाबत या गोष्टींचा गांभीर्याने विचार करुन मी आपणोस एक लेखी प्रस्ताव मा. महापौर यांना या ठिकाणी दिलेला आहे त्याचे मी वाचन करत आहे की नैसर्गिक आपत्तीमुळे बाधा पोहचलेल्या व्यक्तीचे मालमत्ता कर माफ करणेबाबत. ही लक्षवेधी सुचना आपण स्विकारावी. महोदय, उपरोक्त विषयानुसार आपणांस कळवू इच्छितो की मंगळवार दि. २६ जुलैपासून सतत दहा बारा दिवस झालेल्या अतिवृष्टीमुळे मिरा भाईंदर, ठाणे, कल्याण, अंबरनाथ, भिवंडी, मुंबइर्, रायगड, रत्नागिरी, सांगली, कोल्हापूर सह संपूर्ण महाराष्ट्रावर नैसर्गिक आपत्ती कोसळल्यामुळे मोठ्या प्रमाणावर जी अपरिमित जिवित व वित्तहाणी होऊन जनजीवन विस्कळीत झालेले आहे. आपल्या मिरा भाईंदर परिसरात देखील काशिमिरा, लक्ष्मीबाग, महाजनवाडी, मुन्शी कंम्पाऊंड, मिरारोड, शांतीनगर, विजय पार्क, जांगीड कॉम्प्लेक्स, सिल्व्हर पार्क, शितलनगर, नया नगर, लोंढा कॉम्पलेक्स तसेच

भाईंदर पूर्वेकडील नवघर, खारीगांव, गोडदेव, बंदरवाडी, बी.पी. रोड व भाईंदर पश्चिमेकडील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, साठ फूटी रोड, मोदी पटेल रोड, नारायण नगर, जनता नगर, देवचंद नगर, लाल बहाद्दुर शास्त्री नगर, नेहरु नगर, आंबेडकर नगर, राममंदिर रोड, बेकरी गल्ली, सिध्दी विनायक मार्ग, मुर्धा, राई, मोर्वा, उत्तन, डोंगरी, पाली आदी संपूर्ण शहरी ग्रामीण व औद्योगिक वसाहतीमध्ये अतिवृष्टीमुळे शहरवासियांचे फार मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. केंद्र व राज्यशासनाने व आपल्या महापालिका अधिकारी व पदाधिकारी तसेच नगरसेवक आणि सेवाभावी सामाजिक संस्थांनी या आपत्कालीन परिस्थितीत आपदग्रस्त नागरिकांना मदतीचा हात देऊन जनजीवन सुरळीतपणे आणण्यासाठी भरपूर मेहनत घेतलेली आहे. मिरा भाईंदर महापालिकेच्या हद्दीत ज्या ज्या लोकांचे आर्थिक नुकसान झालेले आहे असे शहरी व ग्रामीण व व्यवसायिक यांचे २००५-२००६ या आर्थिक वर्षात मालमत्ता कर मानवतेच्या दृष्टीकोनातुन माफ करणे उचित ठरेल. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३३ (अ) नुसार नैसर्गिक आपत्ती इत्यादीमुळे बाधा पोहचलेल्या व्यक्तींना भोगवटा केलेल्या व्यक्तींच्या बाबतीत मालमत्ता कर माफ करण्याचे अधिकार महानगरपालिकेला आहेत तरी आपण कृपया उक्त अधिनियमामुळे आपल्या मिरा भाईंदर परिसरातील आपदग्रस्त नागरिकांना ते राहत असलेल्या घर किंवा झोपडी, इमारतीमधील तळमजल्यावरील सदनिका व दुकानदारांचे सन २००५-२००६ या एका अर्थिक वर्षाचे मालमत्ता कर माफ करणे बाबतचा प्रस्ताव स्विकारावा असा मी ठराव मांडलेला आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. असिफ शेख, महासभा सुरु होण्यापूर्वी दोन तास आपली लक्षवेधी सुचना यायला पाहिजे होती. आपली लक्षवेधी सुचना ही फार उशिरा आलेली आहे त्यामुळे ती स्विकारण्यात येत नाही.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मला फक्त दोन मिनिटे बोलायचे आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेबा, माझी लक्षवेधी सुचना ही मी दोन तास अगोदरच दिलेली आहे. इतर सन्मा. सदस्यांच्या ज्या काही सुचना असतील किंवा सजेशन असेल तर त्या त्यांनी द्याव्यात.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, लक्षवेधी सुचना आम्हीपण दिलेली आहे. पण ती स्विकारली नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील आपण जरा बसून घ्या.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम आमच्या सुचनेचा जरा गांभीर्याने विचार करावा.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम यांनी मला परवानगी दिलेली आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहीत सुवर्णा आपणांस जे काही बोलायचे आहे ते दोन मिनीटातच बोळावे.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी आपल्या निर्दशनास आणू इच्छितो की सर्व प्रथम आपण आता मा. उपमहापौर हे बोलले की, राज्य शासनाकडून अजून पैसे आलेले नाहीत व येणार आहेत असे ते बोलले. आता दुर्दैवाने ते इकडे नाहीत. मा. आर. डी. शिंदे साहेबांशी माझे बोलणे झाले, डि. सी. साहेबांशी मी देखील बोललो आणि मा. तहसीलदार साहेबांशी माझा संपर्क आहे. श्री. विलास शिंदे म्हणून ह्या ठिकाणी त्यांची नेमणूक करण्यांत आलेली आहे की, या विभागात त्यांनी लक्ष द्यावे. मा. आयुक्तांचे त्यांच्यावर कंट्रोल असणार आहे. अशाच अधिका-यांना शासनाने नेमलेले आहे. त्यांच्याशी देखील सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे आणि मी रोज संपर्कामध्ये आहोत आणि हे बोलतातकी पैसे आलेले नाहीत. मी आपल्याला सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख यांचे पत्रक वाचून दाखवित आहे. राज्य सरकारकी ओरसे कलेक्टरकी और पिडीत लोगोको तलाठी कार्यालय एक एक हजार मदत राशी अपने प्रभाग मे बाँटा।

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य रोहीत सुवर्णा अशा तऱ्हेची पत्रके सभागृहामध्ये वाचता येत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहीत सुवर्णा आपण पत्रक वाचण्यापेक्षा तुम्हाला काही सांगायचे असेल तर ते तोंडी सांगा.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, ठीक आहे आता हे बोलले की शासनाकडून पैसे आलेले नाहीत. लाल बहाद्दुर शास्त्रीनगर आणि नेहरु नगर आणि जांभली आगरातील थोडी घरे तसेच नाझरेथ आगार या ठिकाणी महापालिकेचा सर्व्हे झालेला नसताना पैसे वाटण्यांत आलेले आहेत. त्यामुळे संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये चर्चा आहे

की, पैसे हे महानगरपालिका वाटत आहे म्हणून लोक आमच्या घरी येतात आणि त्यांच्या रेशन कार्डवरती अॅटेडस्टेड करुन द्यावे लागत आहे. असा हा आम्ही मा. जिल्हाधिकारी नंदकुमार जंत्री साहेब यांना फॅक्स करुन विचारले की साहेब एका बाजूने सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख आणि प्रभागाचे अधिकारी स्वप्नील सावंत साहेबांचा देखील फोटो आहेत. ते पैसे वाटत आहेत आणि रेशन वाटत आहेत फक्त लालबहादुर शास्त्रीनगर, नेहरुनगर झोपडपट्टीमध्ये आहे मग आंबेडकर नगर, भोलानगर, गांधीनगर, बांग्लादेश, मोठा आगर, नाझरेथ आगर अशा किती तरी गरीबांच्या झोपडपट्टयामध्ये पाणी गेलेले आहे. मा. महापौर मॅडम आपल्याला माहित आहे त्या मिटींगला आपण आम्हाला बोलाविले ज्या मिटींगला आपण आम्हालाबोलाविले त्या दिवशी तुम्हाला सांगितले गेले की सन्मा. सदस्या नयना म्हात्रे स्वतः ३:०० वाजता जे आपले कर्मचारी घरी गेलेले होते त्यांना रिक्वेस्ट करुन त्यांच्या मदतीने आंबेडकर नगर, भोलानगर, बांग्लादेश येथील स्लॅब तोडला. ज्या ज्या ठिकाणी पाणी ब्लॉक होत होते तो ब्लॉकच काढल्यामुळे पाणी बाहेर यायला लागले आणि आगरामध्ये जमा झाले. ही परिस्थिती सन्मा. सदस्या नयना म्हात्रे यांनी आपल्यासमोर ठेवलेली होती आणि त्याप्रमाणे आपण आदेश दिला आणि नगरपालिकेचे कर्मचारी तिकडे त्याची सर्व येऊन पाहणी केलेली आहे. हा ऑफ रेकॉर्ड आहे. सर्व्हे बरोबर होत नाही आपण कबुल केले की दहा हजार आणि ते बोलतात अडीच हजार. जर माझी दोन मिनीटे पूर्ण झाली असेल तर मी बसेन. धन्यवाद!

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की या ठिकाणी पुरपरिस्थितीवरती कोणी काय केले याबाबत सर्व पक्षाच्या सन्मा. सदस्यांनी भावना ह्या व्यक्त केलेल्या आहेत. प्रत्येक सदस्याने, प्रत्येक अधिका-याने आपआपल्या पध्दतीने या पुरग्रस्त जनतेला मदत केलेली आहे. प्रत्येक सदस्याची भावना आहे की भविष्यात जी काही मदत येईल ती प्रत्येक पुरग्रस्तांपर्यंत पोहचली पाहिजे. त्यादृष्टीने आपण या ठिकाणी सर्वांनी चर्चा केलेली आहे त्याबद्दल सर्व सदस्यांचे, अधिका-यांचे सर्वांचे धन्यवाद. या ठिकाणी फक्त आपण काय काम केले त्यावर चर्चा करण्यापेक्षा येथुन पुढे काय उपाययोजना करायला पाहिजे आणि शासनाकडून कशाप्रकारे जास्त मदत ही यायला पाहिजे यावर आपण जास्तीत जास्त चर्चा करुन त्यादृष्टीने प्रयत्न जर केले तर आपल्या शहरातील जनतेचा फायदा होईल आणि त्यादृष्टीने आपण शासनाला जाबसुध्दा विचारु. महाराष्ट्र शासन तसेच पुन्हा या मिरा भाईंदरचे शासन यासर्वांनी ज्यावेळेला पुरपरिस्थिती आली त्यावेळेला आपआपल्या परीने प्रत्येकाने प्रयत्न केले प्रत्येक सन्मा. सदस्यांनी भावना मांडल्या. सन्मा. सदस्य श्री. रोहीदास पाटील साहेब यांनी थोडेसे राजकिय चिमटे काढण्याचा प्रयत्न केला. त्याचे जेवढे सर्वानी ते चिमटे ऐकले. जशास तसे उत्तरेसुध्दा दिली परंतु प्रत्येक व्यक्तीने आपआपल्या पध्दतीने सर्वांनी ह्या पुरपरिस्थितीत प्रयत्न केलेला आहे. मदत केलेली आहे परंतु कोणाला दोषारोप करण्यात काही या ठिकाणी स्वारस्य नाही. भविष्यात जी काही परिस्थिती निर्माण होऊ नये आणि जी झालेली त्याला आपण सर्व जण समोर जात आहोत. भविष्यात होणा-या परिस्थितीवर आपण कशाप्रकारे सामोरे जायचे या दृष्टीकोनातुन महाराष्ट्र शासनाने त्यांच्या लेव्हलला एक समिती स्थापन केलेली आहे. त्याचप्रकारे मुंबई शहरामध्येसुध्दा समिती स्थापन करणे बाबतचा शासनाने आदेश दिलेला आहे आणि प्रत्येक जिल्हा आणि तालुका स्तरावर आपली समिती असावी असा निर्णय शासनाने घेतलेला आहे त्यादृष्टीने आपल्याकडेसुध्दा समिती स्थापन करावी अशी मी या ठिकाणी विनंती करतो यामध्ये सदस्य हे कोणते असावेत अशी माझी सुचना आहे तरी आपण प्रत्येक सदस्यांची बैठक घेऊन ठरवावे. या समितीमध्ये मा. महापौर, मा, आयुक्त, मा. उपमहापौर, डि.वाय. एस. पी., सहाय्यक निरिक्षक रेशनिंग डिपार्टमेन्ट, मा. तहसीलदार आणि सर्व पक्षाचा एक सदस्य आणि प्रत्येक आपत्तीवर त्यातले तज्ञ व्यक्ती असे एक दोन सदस्य मिरा भाईंदर शहरातील घेऊन अशी जर समिती गठीत केली तर त्या अनुषंगाने आपण येणा-या आपत्कालीनवर जरुर आपण तो पर्याय शोधु शकातो. जसे मागे पाण्याचे आंदोलन झाले त्यावेळेस आपण प्रत्येक सदस्याने आपआपल्यापटीने मदत केली. भविष्यात कोणतीही आंदोलने झाली किंवा नैसर्गिक आपत्ती झाली तर त्यावर आपल्याला मात करणे फार गरजेचे आहे त्याकरीता ही समिति या ठिकाणी गठीत करावी. परत सन्मा. सदस्यांनी सांगितले की राष्ट्रवादी कॉंग्रेस - कॉंग्रेस डांगोटा पिटवत आहेत. डांगोटा हा कुणीही पिटवत नाही. प्रत्येकजण आपआपल्या पध्दतीने कार्य करतो आहे आणि कोणत्या पक्षाचे काम करत आहे आणि कोणत्या पक्षाचे नाहीत हे बोलण्यापेक्षा आपण सदस्य जे कोणी आरोप करणार त्याच्यावर आपण ते कोणती सत्ता भोगतो आहे आणि तेथील परिस्थिती काय आहे या गोष्टीचा आपण जर विचार केला असता तर कोणावर आरोप करण्याची परिस्थिती या ठिकाणी आली नसती. मुंबई, कल्याण पूर्व महाराष्ट्राची परिस्थितीचा विचार करुन आपण सर्वांनी सामंजसाने हा विषय सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत अशी मी या ठिकाणी सुचना मांडत आहे. जयहिंद.

**जयाबाई भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की आमच्या येथे मुंन्शी कंपाऊंड तसेच मिराधाम येथे कंबरेऐवढे पाणी भरलेले होते तिथे कुठल्याही पध्दतीची मदत ही देण्यांत आलेली नाही. याबाबत आपण जरा चौकशी करावी. कुणाकडे ती मदत दिली ते आम्हाला माहित नाही कारण आम्ही नगरसेवक त्या ठिकाणी होतो तरी लवकरात लवकर आमच्या वार्डामध्ये मदतकार्य हे चालु करावे नाहीतर आमच्याजवळ ते देण्यांत यावे. तसेच

ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्यांचासुध्दा अजून सर्व्हे केलेला नाही. तरी त्याची लवकरात लवकर पाहणी करुन त्यांनासुध्दा नुकसान भरपाई देण्यांत यावी ही मी तुम्हाला विनंती करते.

**संगीता म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की..........

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम मी केव्हापासून आपली परवानगी मागत आहे की, मी बोलू किंवा नाही. प्रथम आपण मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात असे नाही परंतु पूर्ण मुंबई, महाराष्ट्रात जी कुदरती आफत आलेली होती त्याच्यामध्ये मा. महापौर, नगरसेवक किंवा कुठल्या अधिकाऱ्याचे असे कुणाचाही त्याच्यात हात नव्हता ते अगदी स्पष्ट झालेले आहे आणि जी काही आफत आली ती अचानक आली. आपण स्थायी समितीच्या मिटींगला होतो आणि माहितसुध्दा पडले नाही की बाहेर एवढा मोठा पाऊस पडत आहे. आणि जेव्हा अचानक स्थायी समितीचे सभापती श्री. मोहन पाटील यांना फोन आला की असे असे या ठिकाण पाणी भरलेले आहे आणि मग त्यांनी सभा स्थगीत केली आणि ते बाहेर पडले. त्यानंतर ती जी काही आफत आली त्याबद्दल आपण विचार करतो की, आपत्कालीन असे झाले तसे झाले. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी एक चांगला मुद्दा उपस्थित केला की जेव्हा आपण लोक प्रतिनिधीची एकच चुक असते की आपण नेहमी वाचविण्याचा प्रयत्न करीत असतो. ती आफत असो किंवा जाणूनबुजून केलेली आफत असो. अधिका-यांनी जरी काही चुका केल्या तरी आपण लोकप्रतिनिधी म्हणून, आपण सत्तेवाले म्हणून आपण त्यांना नेहमी वाचविण्याचा प्रयत्न करतो. आणि तसे उदाहरण आपल्याकडे दोन अडीच महिन्यापूर्वी झालेले आहे काही माणसे प्रामणिक अधिकारी त्यांनी आरोग्य विभागाचा उत्कृष्ट आणि सखोल अहवाल मा. स्थायी समिती पुढे ठेवलेला होता त्यानंतर त्या अहवालावरती पुष्कळसे वादग्रस्त वातावरण निर्माण झाले. आणि मग धरणे धरुन बसलो होतो. मा. महापौर मॅडम आणि तेव्हा ज्या अधिकाऱ्यांनी रिपोर्ट सादर केला होता त्याच्यात सत्य परिस्थिती लिहलेली होती की, या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये कुठलीही साफसफाई नाही आणि नाले भरलेले आहेत, गटारे तुंबलेली आहेत आणि औषध फवारणी होत नाही असा स्पष्ट अहवाल अशा प्रामाणिक अधिका-याने स्पष्टपणे आमच्याकडे म्हणजेच मा. स्थायी समितीपूढे ठेवलेला होता त्यानंतर आपण लोकप्रतिनिधींनी सर्व काही पूढे त्याच्यावर चर्चा वगैरे केले. फक्त एका अधिका-याला वाचवण्यासाठी आपण ते प्रकरण स्थगीत केले, लपवालपवी केली आणि पुष्कळसे वादग्रस्त वातावरण या मिरा भाईंदरमध्ये झाले. तरी आपल्याला येथे मंथन करायचे की आपण वाचविण्याचा प्रयत्न हे लोक प्रतिनिधीचे काम आहे आणि नेहमी आपण त्यांना वाचवायला पाहिजे पण असे जे काही अधिकारी आहेत जे आपले मिरा भाईंदर क्षेत्राच्या लोकांच्या जिवाशी, आरोग्याशी खेळ करत आहेत अशा अधिकाऱ्यांना वाचविण्याचा मा. महापौर मॅडम प्रयत्न करु नये. लोक प्रतिनिधी व आपण सर्वांनी बसून ते सर्व काही मंथन करायला पाहिजे. आपण कुठे चुकलो, एका व्यक्तीला वाचविण्यासाठी आपण सर्व प्रामाणिक अधिकाऱ्यांचा छळ केलेला आहे. दुसरे म्हणजे आपल्या दारावर उभी राहीलेली आफत म्हणजे महामारी. आज मुंबईमध्ये क्रित्येक लोक लेप्टोस्पायरस, डेंग्यु आणि न्यमोनिया असे क्रित्येक रुग्ण बळी पडलेले आहेत. तरी आपले पहिले कर्तव्य आहे की कोणी काय केले आणि कोणी काय नाही केल. कोणावर आपण आरोप करायचा आणि कोणावर आपण आरोप नाही करायचा हे सर्व बाजूला ठेवून आपण अशा आजारांवर जास्तीत जास्त त्या लोकांना मदत करु शकू ते प्रथम आपण बधायला पाहिजे आणि ते बघताना पहिल्यांदा आपल्या येथील कंत्राट पध्दतीने मिरा भाईंदर महापालिकेचे सफाई कामगार जे काही घाण वगैरे उचलता, गटारे वगैरे साफ करतात ते सकाळी ७:०० ते संध्याकाळी ७:०० वाजेपर्यंत कामावर ठेवतात त्यांच्या घरी पंचनामा वगैरे झालेला असून आज त्यांच्याकडे घरी खायला अन्न नाही. घालायला कपडे नाहीत, औषधे नाहीत. क्रित्येक असे कर्मचारी आजारी आहेत त्यांना ताप येतो. ते सर्व कर्मचारी माझ्याकडे आले होते तरी मा. महापौर प्रथम त्याची ती सोय करा की त्यांना अगोदर अन्न, पाणी, कपडे आणि जी काही मदत महाराष्ट्र शासनाने जाहिर केलेली आहे ते आपले कर्मचारी डॉ. बावस्कर हे तुम्ही ऐका. कारण हे तुमचे कर्तव्य आहे. त्या कर्मचाऱ्यांना बोळावून कशा पध्दतीने त्यांना संध्याकाळी ७:०० वाजल्यानंतर त्यांना सुट्टी मिळते. संध्या ७:०० वाजल्यानंतर कशा प्रकारे मदत मिळेल त्याबाबत तजवीज करा. थॅंक्यु. दुसरे एक मा. महापौर धन्यवाद मी आपल्याला स्वतः अभिनंदन देते की यात एक महिला नाही कारण आपण हे नॅच्युरल कॅलक्युलिटी जाईल याच्यामध्ये तुमचे माझे किंवा अधिका-यांचासुध्दा गुन्हा नाही. अचानक आफत आली त्याबद्दळ आपण सक्षमतेने आणि जे धडाडीचे कर्तव्य बजावलेले आहे त्याबद्दळ मी धन्यवाद करते.

**संगीता म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की आमच्या आंबेडकर नगर व सगळीकडे थोडे थोडे पैसे वाटप केले गेले. आमच्या येथील आंबेडकर नगर येथे खरोखरच ज्यांच्या घरात पाणी गेले त्यांना अजूनही काही मदत दिली गेली नाही. सन्मा. सदस्य आसिफ शेख यांच्या वार्डामध्ये गहूसुध्दा वाहून गेले तरी मदत दिली. ते जाऊ द्या. तसेच आता जो सर्व्हे केलेला आहे आणि तो सध्या चालु आहे आणि वारंवार पत्र दिली जातात की सर्व्हे चालु नाही, परंतु तिकडे सर्व्हे चालु आहे आणि ज्यांच्याकडे रेशनिंग कार्ड नसेल आणि ज्यांच्या घरात खरोखरच पाणी गेलेले असेल त्यांना तुम्ही मदत देणार नाही का? असे त्या ठिकाणी बोलले जाते. ज्याच्या घरात खरोखरच पाणी गेलेले आहे त्यांना पहिल्यांदा मदत द्या. ज्यांच्यावर स्टॅम्प मारलेला आहे त्यांचा नंतर

विचार करावा. आमचे वॉर्डमध्ये सगळीकडे लक्ष आहे. दुस-याने त्या ठिकाणी येऊन लक्ष द्यावे असे काही नाही. आमच्या वॉर्डातील नगरसेवक हे सक्षम आहेत.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये सभा सुरु झाल्यापासून केवळ नैसर्गिक आपत्ती जी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ओढवली त्याच्याबाबत चर्चा चालु आहे. नैसर्गिक आपत्ती महाराष्ट्रामध्ये किती मोठ्या प्रमाणात आली हे कोणी कोणाला सांगायला नको. त्याहीपेक्षा आम्ही सुदैव मानायला हवे की आपल्या शहरामध्ये फार कमी प्रमाणात आली. कदाचित आपण परमेश्वराचे आभार मानु या. कारण सदरची आपत्ती ही आपल्याकडे कमी आणि परंतु तरीही सर्वसामान्य सगळ्याच सन्मा. नगरसेवकांनी ज्या भावना या ठिकाणी व्यक्त केल्या. तरी मला असे वाटते की मा. उपमहापौरांना सांगेन की ह्या सगळ्या भावना अशा आहेत की ज्यांना आवश्यक आहे त्यांना ती मदत मिळाली पाहिजे आणि आपण त्या पध्दतीने काम करावे असा एक दम ह्या चर्चेचा सुरु आहे आणि ते मिळेल अशी मी अपेक्षा करते त्याचबरोबर मी या ठिकाणी कोणाचे अभिनंदन करणार नाही. आपल्या लोकशाहीमध्ये सत्ताधा-यांप्रमाणेच आणि सत्ताधारांनी इतक्याच विरोधकांना आपण त्यांना फार मोठे स्थान देतो. निंदकाचे घर असावे शेजारी असे म्हणता येते. त्यात कोणी आपल्याला चर्चा केली नाही तर आपल्याला काम करायला प्रवृत्त होत नाही. तर ती एकप्रकारे आपली प्रेरणा आहे, आपली स्फूर्ती आहे असे मी समजते. यासर्व प्रकारामध्ये आदरणीय मनमोहन सिंग साहेब ज्यांनी महाराष्ट्राचा दौरा केला आणि आदरणीय शरद पवार साहेब ज्यांनी अधिकाधिक पध्दतीने धान्य कसे देता येईल या पध्दतीने त्यांनी आपल्या महाराष्ट्रावर हात ठेवला. वरदहस्त ठेवला. मला वाटते आमच्या नेत्या सोनिया गांधी ह्या येत आहेत तसेच मा. लालकृष्ण अडवाणी साहेबसुध्दा येथे येऊन गेले या सगळ्यांच्या भावनेशी, सगळयांची मते ही अतिशय प्रबळ अशी होती आणि त्याच्या भावना ह्या ज्वलंत होत्या. तुम्ही आणि आम्ही एकमेकांच्या घुंबी पकडतो असे चित्र उभे राहीले असले तरी सगळ्यांच्या भावना या शहराच्या विकासासाठी चांगल्या होत्या. हे एकमेव दिसुन आले म्हणून मी कोणत्याही नेत्यांचे यथे अभिनंदन करणार नाही किंवा आभार मानणार नाही परंतु प्रत्येकाने आपआपल्या परीने पक्ष ठेवलेला आहे आणि चर्चा ही येथेच थांबवावी आणि या शहराला विकास व सायीसुविधा कशा देता येतील त्याचा आपण मागोवा घ्यावा. अशी माझी विनंती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, मी दोन सुचना करणार आहे. पहिली सुचना जेव्हा आता आमचे सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चव्हाण साहेबांनी सांगितले की तिथे आम्ही महाजनवाडीमध्ये गेलो होतो आणि तिथे जो रोष होता एका अतिक्रमणामुळे महाजनवाडी बुडाली आणि तिथे जे अनधिकृत बांधकाम आहे त्या तिकडे तोडण्यासाठी त्या लोकांचा जो आग्रह होता त्याबद्दल कोणीही बोळले नाही म्हणून आपण जातीने लक्ष घालून त्या महाजनवाडीचे पाणी जात आहे त्या तलावामध्ये त्याला लागून जी विहीर आहे त्या विहीरीला लागून जे अतिक्रमण आहे त्याच्यावर महापालिकेने योग्य तो निर्णय घ्यावा. दुसरी गोष्ट आता भाईंदरचा जो उड्डाणपूल आहे. ९० फुट रस्ता त्या ठिकाणी जो खाजगी मालकीचा प्लॉट आहे त्या ठिकाणी मा. महापौर मॅडम भरणी करण्यास सुरुवात केलेली आहे आणि त्या परिसरातील संपूर्ण पाणी म्हणजेच महानगरपालिकेचे गटार हे राहीले बाजूला तर संपूर्ण पाणी त्या रस्त्याच्या बाजूला गटाराने खाली जाते आणि त्या ठिकाणी भरणी सुरु झालेली आहे पुन्हा एक तास पाणी भरले. आता तर काशिमिरा आणि मिरारोड हे बुडालेले आहे. भाईंदर ९० फुटी रस्ता आणि आईस फॅक्टरी हा संपूर्ण परिसर बुडणार आहे त्याच्यावर आपण आताच अधिका-यांना पाठवून त्याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की माझ्या ज्या सुचना आहेत त्या मी लवकरात लवकर दोन मिनीटात सांगतो. कोणाला आदेश द्यायचा तो तुम्ही द्यायचृ आता पुरपरिस्थिती बाबत एवढी चर्चा केली. पुर येऊन गेला चर्चासुध्दा संपत आली. चेना नदीमध्ये जी झाडे अडकलेली आहे ते पुराच्या पहिल्या दिवसापासुन आहेत तर मला असे वाटते की हे सर्व सन्मा. सदस्यांनी बघितलेले असेल परंतु अजून ती झाडे निघालेली नाहीत. दुसरे मी सभागृहाला विनंती करतो आहे की एकमताची मागणी अशी असावी की महाराष्ट्र शासनाकडे जी आता निधी उपलब्ध करण्याची प्रक्रिया आहे ही सुरु आहे. तर आपल्याकडचे पुरनियंत्रण करण्यासाठी पुरनियंत्रण करण्यासाठी वेगळझ असा निधी मिळणार आहे. आपल्या महानगरपालिकेकडून २५ कोटी रुपयांचा निधी आपण शासनाकडून मागवावा असे मा. महापौरांचे किंवा मा. आयुक्तांचे पत्र तातडीने जाणे गरजेचे आहे. नाहीतर ते वाटप झाले मग आपल्याला काही मिळणार नाही.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की मी लक्षवेधी ही दिलेली आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की आमचे मत हे निराले आहे की आजचा प्रश्नोत्तराचा तास हा स्थगित करावा कारण की जवळ जवळ दोन सव्वा दोन तास या आपत्तकालीन परिस्थितीवर चर्चा करा.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग बाकीचेसुध्दा विषय स्थगित करा. आमचे प्रश्न आहेत म्हणून का?

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब आम्ही तुमच्या प्रश्नांचा आदरच करतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

आम्हालासुध्दा अजून बोलायचे आहे.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब आपण तसे मांडा की प्रश्नोत्तराचा तास हा रद्द करु नये.

**प्रफुल्ल पाटील :-**

सभागृह नेत्याची अशी तयारी असेल की ते पक्षपातीपणा करतात. सभागृह नेत्यांनी उलट आमची बाजू घेऊन बोलायला पाहिजे. आणि तुमच्याकडून ह्या लोकांच्या तशा अपेक्षा आहेत. सन्मा. महापौर मॅडम आपत्तकालीन परिस्थितीमध्ये आढावा घेण्यासाठीची बैठक जवळ जवळ आज झाली. खरे म्हणजे या विषयावरती सन्मा. नगरसेवकांची सभा बोलावली असती तर मला वाटते दिवसभर ही चर्चा झाली असती परंतु तरीसुध्दा आपण चांगले काम केले की, अर्जंट बेसेसवरती आपण नगरसेवकांना फोन करुन बोलाविले. त्यातील बरेचसे नगरसेवकांना निमंत्रण हे मिळाले नाही आणि बरेचसे वेळे अभावी येऊ शकले नाहीत. एकंदरीत आपण जी काही चर्चा करतो त्याच्यामध्ये आरोप आणि प्रत्यारोपाशिवाय कुठलाही निष्कर्षाला आपण गेलेलो नाही. मघाशी तीन तासाच्या बैठकीमधून चर्चेतुन असे काहीही निष्पन्न झालेले नाही की अमुक बाबतीत अमुक निर्णय घ्यावा. आणि अमुक बाबतीत आपण प्रशासनाला असे निर्णय दिले काही गोष्टी ह्या थोडक्यात सांगणार आहे. जास्त वेळ सभागृहाचा न घेता ज्यावेळी मिरारोड स्टेशन ते भाईंदर रेल्वे फाटक या दरम्यान नगरपालिकेच्या कारकिर्दीमध्ये मिरारोड पूर्वेला जास्त पाणी भरते म्हणून पश्चिमेकडे त्याचा निचरा व्हावा म्हणून ५ करोड त्यावेळी आम्ही सुचविले होते आणि त्याला मंजुरी तात्कालीन सभागृहाने दिलेली होती. कारण मी त्या दिवशी वैयक्तीकरित्या सांगितले की मी काही कोणावर आरोप करायला उभा राहीलेलो नाही. आपण जे काही आपल्यावरती जे संकट आले यदाकदाचित यामध्ये भुकंप झाला असता तर मला वाटत नाही आपण एकमेकांशी भांडलो असतो उलट आपण एकमेकांच्या मदतीसाठी धावलो असतो. दुर्दैवाने यावेळी मुंबईचे आणि इथल्या सर्व शहरी भागांचे आहे की कुठलेही राज्य किंवा मोठे शहर आपल्या ह्या मदतीसाठी आलेले नाही. जेव्हा बाहेरुन आपल्याला मिळत नाही तेव्हा आपण एकमेकांना मदत करण्याचा मनोदय हा ठेवला पाहिजे. असे करत असताना आपत्तकालीन परिस्थितीमध्ये आम्ही नियंत्रण काही करु शकलो नाहीत. त्याला काही गोष्टी कारणभुत आहेत कदाचित त्या माझ्या वैयक्तिक असतील किंवा इतर अनेक लोकांच्या वैयक्तिक चुकांमुळे घडत असतील कालांतराने त्या घडत आलेल्या आहेत आणि मग एक दिवशी आम्हास असे कळते की मिठी नदी वाहून गेली आणि त्यासाठी आजचे हे बोलणे होत आहे की जेव्हा मिरारोड स्टेशनपासून रेल्वे फाटकापर्यंतची हा पाच कलवट मंजूरी असतांनासूध्दा जाणुनबुजून स्थायी समितीने त्याच्या सर्व्हेसाठी त्याला मंजूरी दिली नाही ही सर्वप्रथम दुर्भाग्याची बाब. खरे म्हणजे स्थायी समितीला ऐवढेसुध्दा माहित आहे की आपण सभेसाठी मंजूरी देतो त्याच विषयामध्ये हा कळवळीचा विषय आहे. आणि फोर पॅकींग होत आहे. चार लोहमार्ग चौपदरीकरण होत आहे तेव्हा या गोष्टीचे महत्व लक्षात घेतले पाहिजे होते. त्या कळवळला आपण जर वेळेमध्ये सेन्शन जर दिले नाही तर त्याचा सर्व्हे लवकर होणार नाही आणि गेल्या दोन तीन वर्षामध्ये.......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री प्रफुल्ल पाटील साहेब आपल्या सुचना ज्या काही आहेत त्या थोडक्यात मांडा.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, दुसरी बाब अशी की ज्या ठिकाणी नाले हे खोदले गेले असा हा या ठिकाणी वक्तव्य केले गेले तर प्रत्यक्षात आज पण तुम्ही पहा जे नाले खोदले गेले ते शहर भागापुरतेच आहेत. शहरी भाग ज्या ठिकाणी संपतात तिथुन तो उघाडीपर्यंत नाले हे खोदले गेलेले नाहीत. तितका भाग महत्वाचा असा आहे की, आपल्याकडे नगररचना विभाग आणि अतिक्रमण विभाग, आरोग्य विभाग यांच्यामध्ये कधीही समन्वय नसतो. एक छोटेसे उदाहरण देतो, गोडदेव येथील गोडदेव गावाच्या मागील गोल्डन नेस्टकडे जाणारा रस्ता एक मोठा एका बिल्डरांने तो बंद केला तो नाला सन्मा. सदस्य श्री. तुळशिदास म्हात्रे यांनी खोदून काढला. जे.सी.बी.च्या सहाय्याने तो खोदुन काढला चार तासाने परत तो नाला झाला. आपल्या नगरपालिकेचे पाईप, आपल्याच नगरपालिकेची जे.सी.बी. आणि आपल्या नगरपालिकेची माती चार तासाने त्याच ठिकाणी सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील यांनी जाऊन तो नाला खोदला आपल्याला याची जरा गंमत वाटते आणि अधिकारी जीवघेण्या सारखा खेळ करतात आणि त्याच्यासाठी आपण काही करत नाही. एकमेकांवर आरोप करण्यापेक्षा ज्या अधिकाऱ्यांनी अशा प्रकारच्या नाल्यावरती बंद करायला किंवा गटारे बंद करायला परवानगी दिली किंवा पाहून सुध्दा दुर्लक्ष केले त्याच्या वरती ताबडतोब कारवाई व्हायला पाहिजे एका दिवसामध्ये तीनवेळा नाला बंद केला आणि तीन वेळा खोदला. तिसऱ्या वेळी मी खोदला. गेले दोन दिवस झाले मी अधिकाऱ्यांना फोन करून सांगतो की नाला बंद झाला. जर तो नाला बंद झाला तर यावेळी नयानगरला पाणी पुन्हा भरेल एकच दिवस पाउस पडु द्या आणि मग तुम्ही कसे साफ करायला येतात ते बघतो. तर तुम्हाला नाल्यातच घालून टाकतो अशी जर भुमिका आम्ही आणि नागरीकांनी घेतली तर काय परिस्थिती होईल आणि एवढे होउन सुध्दा आजही आपत्कालीन परिस्थिती वरती चर्चा करतो आहे परंतू निर्णय आम्ही कधीच घेत नाही. नगररचना विभागाला

आम्ही असे सांगा की तुम्ही परमिशन देतात तेव्हा त्या बिल्डरला आपली बिल्डींग बांधताना जो रस्ता पाहिजे तो रस्ता नगरपालिकेचा वापरतो की दुस-याचा वापरतो आहे तो नाला बंद करतो. नाल्यावरती एक स्लॅब टाकण्यासाठी डिझाईन करा असे मा. आयुक्तांना मी पत्र दिले होते. सगळे नाल्याचे बाजूच्या बिल्डींगला तुम्ही परमिशन दिले आहे. त्या सर्व परमिशन देतांना बिल्डर आपल्या सहीने खाते काढतो. जर नगरपालिकेने याबाबत दखल घेतली असती तर असे घडले नसते परंतू नगररचना विभागाने कधीही लक्ष घातले नाही. सर्वात महत्वाचा विषय तीन वर्षापुर्वी आम्ही जेव्हा नाले या डि.पी. प्लॅनमध्ये दाखवलेले होते ते नाले पुन्हा रेखाकंन करण्याचा निर्णय घेतला होता. अतिशय चांगला निर्णय त्या सर्व साधारण सभेने त्यावेळी तत्कालीन नगरपरिषदेच्या काळामध्ये घेतला होता. परंतू नगररचना विभागाने ३७(अ) खाली टाउन प्लॅनचे रिझर्व्हेशन हटविण्यासाठी जेवढी घाई केली घंगाळे यांच्या शाळा वाचविण्यासाठी तेवढी नगरपालिकेच्या नगररचना विभागाने ते नाले पुन्हा नकाशात दाखविण्याची घाई केली नाही ३७(अ) चा ठराव झाला होता तो आता स्टेट गर्व्हमेंटच्या बासनात पडलेला आहे कधीही नगरपालिकेने त्याबाबत पाठपुरावा हा केलेला नाही परंतू अनधिकृत बांधकाम थांबवायला हे नगररचना विभाग हे किती सक्षम आहे आणि किती पुढाकार घेते याचे हे जाती वाचक उदाहरण आहे. आरोग्य विभाग जेव्हा हे नाले खोदते तेव्हा त्या आरोग्य विभागाला सार्वजनीक बांधकाम विभाग हे कधीच सांगत नाही की त्या ठिकाणी आमचा रस्ता आहे किंवा कलवट आहे. आणि आमच्या कलवट ह्या संपुर्ण बंद झाल्या कृपया मॅडम ह्या सभेमध्ये आम्ही तुम्हाला काही सांगायचे आणि तुम्ही निर्णय घ्यायचे अशातला भाग नाही. ज्या गोष्टी आहेत त्या घडलेल्या गोष्टी आहेत. नाल्यामध्ये अनधिकृत बांधकाम झाले आणि ८, ९ लोक गेले आणि आता जे गेले त्यांना आम्ही मदत देणार आणि ज्यांनी वाचवले त्यांना आम्ही बक्षिसे देणार आणि जर मदत देउन लोकांचे जीव परत मिळत असतील तर हजार लोक मारा तुम्ही रोज हजारो लोक मारा या देशामध्ये या राज्यामध्ये, या शहरामध्ये लोकांच्या जीवनाला काहीच किंमत राहिलेली नाही आणि आपण काय छानपैकी उत्तरे देतो की, त्या लोकांवर एम.आर.टी.पी. केली आहे. कोणी केली? कुठल्या अधिकाऱ्यांने केली? कधी केली? का तुम्ही सांगितल्यानंतर केली आणि तेवढ्यातूनसुध्दा ती चाळ पुन्हा उभी राहिली आणि तशातून सुध्दा त्या चाळीत नळाचे कनेक्शन सुध्दा दिले गेले ही शरमेची बाब आहे. ज्या दिवशी या चाळी मधील ९ लोक वाहून गेले त्याच दिवशी तो अधिकारी निलंबीत व्हायला पाहिजे होता जर तुम्हाला प्रामाणिकपणे काम करायचे असेल तर चोवीस तासात त्या अधिकाऱ्याला निलंबीत करून टाका. एवढीच माझी तुम्हाला विनंती आहे.

**मा. उपमहापौर :-**

आतापर्यंत मा. महापौरांच्या वतीने बोलतो आहे की, आतापर्यंत ज्या ज्या सुचना सर्व सदस्यांनी केल्या त्या सर्व सुचनावरती ज्या ज्या संयुक्तीक आहेत आणि त्याच्या वरती तातडीने कारवाई करावयाची आहे. त्या सगळयांवरती कारवाई केली जाईल. आणि सन्मा सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी जे नाल्या विषयी ज्या सुचना केल्या आणि ज्या रेल्वे क्रॉसींग ज्या केलेल्या आहेत तर रेल्वेने आपल्याला त्याच्या परवानग्या दिलेल्या आहेत. त्याच्यावरती आपण लवकरच कामकाज सुरु करणार आहोत. आणि पावसामध्ये जिथे जिथे जूने नाले होते डायर्व्हेशन दिलेले आहे आणि ज्यांच्यावर बांधकाम घातलेले आहे. त्या सगळ्यांवरती आपण मोठ्या प्रमाणात कारवाई करण्याचे तसे प्रशासनाला निर्देश दिलेले आहेत आणि या सर्वावरती कारवाई प्रस्तावीत करणार आहोत आणि आजच्या मंजूर विकास योजनेवरती नाल्याची आकडी नाही तरी त्याच्यामध्ये देखील आपण नवीन नाले हे प्रस्तावीत करणार आहोत. आपल्या सर्वांच्या म्हणजे सर्व सन्मा. सदस्यांच्या नाल्याविषयी ज्या ज्या काही सुचना येतील त्या सर्वानवरती अंमल केला जाईल. दुसरी गोष्ट म्हणजे बऱ्याच नगरसेवकांच्या तोडून निघालेला विषय की आपल्या परिसरात कुठल्याही प्रकारची मदत ही झालेली नाही. आता नुकतेच मी पुन्हा सर्कल साहेबाशी बोललो तेव्हा त्यांनी सांगितले की कमीत कमी ५ फुट पाणी जर गेले असेल आणि काल पर्यंत मुंबई मिडडे मध्ये अशी बातमी आली की आमच्या घरामध्ये पाणी गेली नाही तरी आम्हास दहा दहा किलो तांदूळ दिले आणि आपल्याकडे जर असा प्रश्न उपस्थित होत असेल तर सभा चालू आहे परंतू आज उद्या कसाही आपण वेळ काढून जर सर्व नगरसेवक या मागणीसाठी मा. कलेक्टर ऑफीसला गेलो आणि आपण एकमुखी मागणी केली तर आपण निश्चीतपणे यशस्वी होउ सर्व नगरसेवकांची तशी एकमुखी मागणी व्हायला पाहिजे आपण आता प्रश्नोत्तराचा तास होता त्याच्यावरती सभागृह नेत्यांनी टिप्पणी केली होती. सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब कुठलाही प्रश्न डावलण्याचा कोणताही उद्देश नाही. परंतू सभेच्या कामकाजाला रितसर अजून सुरुवात झालेली नाही आणि रितसर झाली नसली तरी त्याचे कारण तितकेच महत्वाचे आहे. शहरामध्ये जी परिस्थिती उद्भवली त्याच्यावरती सर्व नगरसेवक ज्या पध्दतीने चर्चा करत होते ती चर्चा होणे गरजेची होती. जर आपण मान्यता देत असाल तर पुढच्या सभेमध्ये तेच प्रश्न ठेवत नसेल तर आपण प्रश्नोत्तराला सुरुवात करु या.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण सन्मानाने विचारता तरी आपल्याला एकच विनंती करतो की, तुम्ही आमचे प्रश्न बघा ते किती वर्षापुर्वीचे आहेत आणि त्याच्यात पहिला प्रश्न हा मा. महापौराचाच आहे आणि तो प्रश्न ज्या कालावधीकरीता विचारला गेलेला होता तो कालावधी सुध्दा संपला. तर त्याच्यावर आपण काय कार्यवाही करणार आहात. त्याच्यानंतर आमचेही प्रश्न त्याच्यावर कार्यवाही करण्याचासुध्दा कालावधी संपला. अशा प्रकारे प्रश्न

विचारण्याचा अधिकार सन्मा. सदस्यांचा किंवा लोक प्रतिनिधींचा आहे. प्रशासन आणि तुम्ही जर त्याला बासनात बांधून ठेवायचे असेल तर सगळ्यांचे प्रश्न कालांतराने मर्यादेबाहेर जातील. आम्हाला त्याचे काही वाईट वाटत नाही पण याच्यापुढे मा. महापौर मॅडम असा या ठिकाणी निर्णय घ्या की कामकाज नियमामध्ये प्रश्नोत्तराचा तास असे म्हटलेले आहे. आपण शिक्षिका आहात. त्याच्यामुळे आपल्याला तास आणि तासिका याच्यातला फरक कळतो. तास म्हणजेच एक तास आणि तासिका म्हणजे ३५ मिनिटे. आपण कृपया तो प्रश्नोत्तराचा तास हा एक तासावर करा आणि याच्यापुढे डिक्लेरेशन देतांना सांगा की, एका तासात मी वीस प्रश्न हे धडीस लावणार आहे. तेव्हा त्या प्रश्नावर बोलण्यासाठी पाच मिनिटे द्या. पाच मिनिटानंतर त्याची वेळ बंद करा आणि आता तुमच्या सन्मानार्थ आम्ही हे प्रश्न मागे घेतो.

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराचा तासाला सुरुवात करण्यात यावी. प्रश्न हे मागे घेतल्याबद्दल धन्यवाद.

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांनी सन्मा. सदस्यांच्या लक्षवेधी सुचना त्या स्विकारलेल्या नाहीत. तरी प्रकरण क्र. २४ ला सुरुवात करत आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की लक्षवेधी सुचना फेटाळण्याचे कारण तरी सांगण्यात यावे. लक्षवेधी तुम्ही फेटाळता. आम्ही नियमानुसार लक्षवेधी दिलेली आहे आणि महानगरपालिकेच्या संदर्भातच आम्ही लक्षवेधी दिलेली आहे.. त्याच्यावर चर्चा करायची नाही का? आम्ही कोणावर आरोप हे केलेले नाही? मग लक्षवेधी आपण फेटाळता का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील साहेब आपण जी लक्षवेधी दिलेली आहे. मघापासून याच विषयावरती चर्चा ही पुर्ण झालेली आहे आणि आपल्याला अजून या विषयावरती चर्चा ही अपेक्षित आहे का?

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की आम्ही लक्षवेधी दिलेली आहे आणि चर्चा केली परंतू आम्ही चर्चेमध्ये भाग हा घेतला नाही. कारण आम्ही लक्षवेधी दिल्यानंतर चर्चेमध्ये भाग घेतलेला नाही. आपण सर्व सन्मा. सदस्यांना बोलण्यास परवानगी दिली आणि ते तसे बोलले. सन्मा. सदस्य सर्व काही बोलले पण लक्षवेधी ही मी दिलेली आहे. त्या संदर्भात मी बोललेलो नाही. आपण माझी लक्षवेधी स्विकारा. पाहिजे तर त्याच्यातले दोन शब्द फक्त मी बोलतो आणि ती स्विकारून घ्या. ती लक्षवेधी फेटाळून लावू नका.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रथम आपण आपल्या महानगरपालिकेत नविन मा. आयुक्त साहेब आलेले आहेत. प्रथम आपण त्यांचा परिचय करून दिला आणि मिटींगला सुरुवात केली तर ते बरे होईल.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांना विनंती करतो की, मिरा भाईंदरच्या भविष्यासाठी आम्ही कोणावरती आरोप, प्रत्यारोप केलेले नाहीत.

**मा. आयुक्त :-**

सर्व सन्मा. सदस्यांना मी माझा परिचय करून देत आहे. माझे नाव आहे सुदाम चंद्रकांत गायकवाड, मी शिर्डी नगरपालिकेत कार्यरत होतो आणि दोन महिन्यापासून शिर्डीचा कार्यभार हा सोडलेला आहे. दोन महिन्यापासून कालच शासनाने माझी ऑर्डर केलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेत आयुक्त म्हणून ऑर्डर केलेली आहे. बहुसंख्य सन्मा. सदस्य हे माझ्या परिचयाचे आहेत. परंतू काही जे नविन सन्मा. सदस्य हे निवडून आलेले आहेत त्यांचासुध्दा आता परिचय हा झालेला आहे. प्रशासनाकडून ज्या ज्या ठिकाणी आपली मदत लागेल त्या त्या ठिकाणी मी तुमच्याकडून तशा मदतीची अपेक्षा करतो आणि प्रशासनाकडून आपल्या जे काही हवे आहे या शहराच्या विकासासाठी या शहराच्या इतर प्रश्न संदर्भात जे काही प्रश्न असतील त्या संदर्भामध्ये प्रशासनाकडून जेवढ्या मदतीची आपल्याला अपेक्षा आहे त्यापेक्षा जास्त मदत देण्याची निश्चितच प्रयत्न करीन. या ठिकाणी प्रथमच मी या महासभेमध्ये आलेलो आहे. महानगरपालिकेच्या संदर्भामध्ये अजून पाहिजे तेवढा म्हणावा तसा मी अभ्यास केलेला नाही. तरी पण आपण अभ्यास करू अशी मला कल्पना आहे. त्या दृष्टीने लोकप्रतिनिधी आणि प्रशासन या दोन्हीच्या मदतीने आपण या शहराचा विकास करू या. शहराचे जे काही प्रश्न असतील गांर्भीयाने जे काही जीवनावश्यक प्रश्न असतील ते तातडीने सोडविण्याचा आपण प्रयत्न करू या. आताच जो काही महाराष्ट्रावरती महापुराचा फटका बसलेला आहे. त्याला आपण आतापर्यंत सामोरे गेलेले आहोत. शासनाने याबाबत पुढाकार घेउन मदतीचा ओघ सुरु ठेवलेला आहे किंवा त्या संदर्भामध्ये जे काही कोणाच्या तक्रारी वगैरे असतील तरी त्याचासुध्दा पाठपुरावा आपण करण्याचा सुध्दा प्रयत्न करू या आणि हे शहर स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी माझयाकडून जेवढी मदत किंवा जेवढ्या तुमच्या अपेक्षा असतीत तेवढ्या अपेक्षा पुर्ण करण्याचा मी नक्की प्रयत्न करीन. यापेक्षा जास्त आणखी काही सांगावे असे मला काही वाटत नाही. तरी सुध्दा आपल्या ज्या काही सुचना असतील त्यांचा जरूर आदरपुर्वक विचार केला जाईल. धन्यवाद.

**रोहिदास पाटील :-**

मा. महपौरांच्या परवानगीने बोलतो की जसे मा. आयुक्तांनी निवेदन केले मी सभागृहाच्या वतीने मा. आयुक्तांचे प्रथम या सभागृहात स्वागत करतो. आपण या मिरा भाईंदरच्या विविध समस्यासाठी अहोरात्र झटावे अशी मी अपेक्षा करतो. तुमच्या कारकिर्दीमध्ये तुम्हाला यश मिळावे आणि आम्हांसही काम करण्यामध्ये यश मिळावे अशी मी अपेक्षा करतो. धन्यवाद.

**रतन पाटील :-**

मा. महपौरांच्या परवानगीने बोलतो की, आदरणीय आयुक्त सुदामजी गायकवाड साहेब यांनी आज मिरा भाईंदरच्या द्वितीय आयुक्त पदाचा चार्ज घेतलेला आहे. तर आजच्या ह्या सभागृहाच्या संदर्भात या मिरा भाईंदरच्या विकासासाठी ज्या ज्या पध्दतीने प्रशासनाला आमच्याकडून सहकार्याची अपेक्षा असेल तर प्रशासन आणि लोकप्रतीनिधी यांचे अतूट जे सहकार्याचे नाते आहे तरीसुध्दा आज सांगावेसे वाटते की ज्या ज्या वेळेला सहकार्याची अपेक्षा आहे त्या त्या वेळेला आमचे सहकार्य हे प्रशासनाला राहील अशी मी ग्वाही देतो. त्याचबरोबर सन्मा. आयुक्त साहेबांचा कार्यकाळ यशस्वीपणे जावा अशी आई भवानीच्या चरणी मी प्रार्थना करतो. जयहिंद, जय महाराष्ट्र

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये सन्मा. जेष्ठ नगरसेवक रोहिदास पाटील आणि सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी सभागृहात नवनियुक्त आयुक्त यांचा अभिनंदनाचा ठराव मांडलेला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आणि सभागृहाच्या वतीने मी आयुक्त सुदामराव गायकवाड साहेब यांचे या ठिकाणी स्वागत करत आहे. आणि प्रशासनाच्या वतीने आपण भविष्य काळामध्ये ज्या काही योजना राबवाल त्या योजनाच्या पाठीमागे संपुर्ण सभागृह, सर्व सदस्य आपल्या पाठीशी असतील आणि पक्षाच्या वतीने आपल्याला शुभेच्छा देतो आणि आपल्या पुढील कार्यकाळासाठी आपल्या शुभयश चिंतीतो

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आजचे आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेला लाभलेले द्वितीय आयुक्त श्री. सुदाम गायकवाड साहेब यांनी मिरा भाईंदर मध्ये प्रवेश केलेला आहे. आमच्या मिरा भाईंदरचे खरेच सोनं करावयाचे असेल तर त्यांनी आमच्या येथे वेगवेगळे कार्यक्रम घ्यावेत, आमच्या शहरातील चौपाटी सुंदरीकरण करावयाची आहे. दवाखाना उघडायचा आहे त्यासाठी आपण युध्द पातळीवर जास्तीत जास्त प्रयत्न करून मिरा भाईंदरच्या शहरवासीयांचे तसेच लोकप्रतिनिधिंचे त्यास सहकार्य राहील आपल्या या मिरा भाईंदर अनेक अशा समस्या आहेत. आता मध्येच जो महाराष्ट्रामध्ये पावसाने जो पुराचा तडाखा दिला त्या तडाख्यामुळे आपल्या मिरा भाईंदर मधील काही जो पाणी जाण्याचा मार्ग म्हणजे निचरा होण्यासाठीचे जे मार्ग होते ते सुधारावेत आणि आपल्या या पुढील कार्याला आमच्या शहर विकास आघाडी तर्फे शुभेच्छा व्यक्त करतो आणि आम्ही आपले हार्दिक स्वागत करतो. धन्यवाद.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आजच नव्याने आपल्या या नगराच्या महानगरपालिकेचा पदभार स्विकारलेले सन्मानिय आयुक्त सुदाम गायकवाड साहेब यांचे कॉग्रेस पक्षाच्या वतीने मी येथे स्वागत करते आपल्या कारकिर्दीमध्ये आपण जितकी वर्षे सेवा प्रशासनामध्ये केलेली आहे. तरी आपल्या प्रशासनाच्या या शहराला फायदाच होईल अशी मी अपेक्षा करते या शहराच्या ब-याच गरजा आहे आणि ही महानगरपालिका नव्यानेच स्थापन झालेली आहे. पंरतू आपल्या प्रशासनाचा अनुभव हा नक्कीच मोठा आहे. ब-याच समस्या ह्या जरी सोडविलेल्या असल्या तरी काही मोजक्याच पण गंभीर समस्या आहेत. तरी या आपल्या कारकिर्दीमध्ये ह्या समस्यांना वाट केली जाईल. या शहराच्या विकासामध्ये पाउल पुढे पडेल आमच्याकडून शक्य ते सहकार्य नक्कीच मिळेल परंतू आपण या शहराच्या विकासामध्ये हातभार लावाल अशी अपेक्षा व्यक्त करून मी आपले स्वागत करते. धन्यवाद.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की मिरा भाईंदर महानगरपालिकेचे दुसरे आयुक्त म्हणून शासनाने काल आपली नियुक्ती केली. महापालिकेचे आयुक्त म्हणून आपण स्वतः सुदाम गायकवाड आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका आजपासून ह्या मिरा भाईंदर शहराचा काटेरी मुकुट आपल्या डोक्यावर ठेवण्यात आलेला आहे. हे मी मुद्दामहून बोलतो कारण की, मी गोड बोलणार नाही, हसतही बोलणार नाही आणि तुम्हाला असे मधाळसुध्दा बोलणार नाही. कारण प्रत्येक ठिकाणी आजच्या परिस्थितीला जो अधिकारी तिकडे गेलेला आहे त्याच्या डोक्यावरती काटेरी मुकुटच आहे. इकडून गेलेले आयुक्त यांना सुध्दा कल्याण डोंबवली सारवायची आहे. आपण सुध्दा इकडे नविन आलात आणि आपल्या सुध्दा काही चॅलेजींग आहे हे त्रिवार सत्य नाकारता येत नाही. या सर्व परिस्थितीमध्ये जनतादल या पक्षाचा मी गटनेता या नात्याने प्रशासनाचे कामकाज करत असतांना आपल्या बरोबर सर्व प्रकारे आम्ही यशस्वीरित्या एकत्र राहू. कुठल्याही त्यामध्ये दुवाभास राहणार नाही किंवा कुठला नाटकी आवेश राहणार नाही जे काही बोलायचे असते ते तोंडावर बोलायचे असते. उगाच खोटे बोलून चालत नाही. पाचशे रुपयाची नोट ही कोणी बनवू शकत नाही. त्याला पाचशे रुपायाची नोटच लागते. राजा बनता येते. सगळे काही करता येते पण पाचशे रुपायाची नोट चालत नाही. डुप्लीकेट

असेल तर ती पण परत केली जाते. तरी आपल्या या भविष्याच्या कारकिर्दीला आमच्या शुभेच्छा आहेत आणि आपण जी पुढे कार्यकाल चालू कराल त्याला आमची चांगली साथ असेल. वेळ पडल्यास याच सभागृहात आपल्याबरोबर आम्ही संघर्ष सुध्दा करू जर कुठे चुकलात तर ते आम्ही दाखवून सुध्दा देउ. कारण आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. कारण शेवटी लोकही आम्हाला खेटराने मारतात. शेवटी आम्हाला आमचे सांगावे लागते हे सत्य परत बोलतो आणि मी माझे भाषण संपवतो.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आज या ठिकाणी मा. सुदामराव गायकवाड साहेब आलेले आहेत. त्याचे मी स्वागत करतो. गायकवाड साहेब माझे नाव रोहीत सुवर्णा आहे. मी स्विकृत नगरसेवक आहे. पाच लाख एकतीस हजार मतदार या मिरा भाईंदर मध्ये आहेत जवळ जवळ साडेसात लाखाच्या वर वस्ती आहे. पॉप्युलेशन आहे आणि एक ते दीड लाख वोटींग पॉप्युलेशन आहे म्हणजे जवळजवळ दहा लाख वस्ती असलेले हे शहर मुंबईच्या जवळ असल्यामुळे लोकांचा एक्सपेक्टेशन मुंबईसारखा आहे. असे असताना मी आपल्याला सांगू इच्छीतो की साडे पाच लाख मतदारपैकी एक लाख त्र्यान्नव हजार मतदार हे झोपडपट्टी व दलित वस्त्यामध्ये रहातात. त्यामुळे या ठिकाणी अजून वाल्मीकी आंबेडकर आवास योजनेसारखी मोठी स्कीम जी सेंट्रल गर्व्हमेंटची स्कीम होती ती अजून राबवली गेली नाही. तरी आपण मोठ्या अनेक प्रोजेक्ट आहेत ते मी आता सांगु इच्छीत नाही. परंतू मी आपणांस विनंती करेन आपण अशा प्रोजेक्ट इम्प्लीमेंट करण्याच्या बाबतीत जातीने लक्ष द्याल. कुठलाही प्रकारचा आमचा राजकारण उद्देश जरी नसला तरी सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष हे दोन्ही सामंजस्याने सभागृहामध्येच फक्त आमचा मतभेद असतो बाहेर हा कधीच नसतो बाहेर आम्ही भाई भाई आहोत. भाई म्हणजेच दादागीरी मधला भाई नाहीत. भाई म्हणजेच आम्ही भाई भाई आहोत. आपण या ठिकाणी आलात. धन्यवाद. आभारी आहोत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, मिरा भाईंदर मध्ये मा. आयुक्त पदी सुदामराव गायकवाड यांची शासनाकडून नेमणूक झालेली आहे आणि या नेमणुकीचा आम्ही सर्व सन्मा. नगरसेवक, नगरसेविका त्यांचे स्वागत करतो. या मिरा भाईंदर शहराचा कायापलट करण्यासाठी आपण निश्चित पणे प्रयत्न कराल अशी मी आशा बाळगतो. आमच्याकडून म्हणजे आमच्या सर्व सन्मा. सदस्यांकडून जे सहकार्य पाहिजे असेल ते सहकार्य देण्याचा आम्ही निश्चितपणे प्रयत्न करू. आपण या शहरात आल्याबद्दल आपले प्रथमतः धन्यवाद आणि या शहराचा कायापलट करण्याचा आपण जरूर तो प्रयत्न कराल एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवतो.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, सर्व काही झाले आणि मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की, मी शिर्डीहून आलेलो आहे. माझे मन नव्हते. कारण की, आपला भरपूर सत्कार झालेला आहे असे मला वाटते. कारण अति झाले की माती होते. पण मला असे वाटते की, तुम्ही शिर्डीच्या साईंच्या दरबारातून आलेले आहेत आणि त्याचे सुत्र आहे, श्रध्दा आणि सबुरी. आम्ही श्रध्दा पण ठेवू आणि सबुरीपण ठेवू. पण शेवटी आम्हांला काहीतरी कार्यसुद्धा पाहिजे. तसा मी तुमचा सत्कार करते. जयहिंद! जय महाराष्ट्र!!

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम आणि आजच या महापलिकेत सभागृहासमोर पहिल्यांदा येताना मा. आयुक्त गायकवाड साहेब. साहेब आजची महासभा चालू होती. परंतु, या शहरावरती जे संकट आलेले होते त्यापैकी बऱ्याच प्रमुख लोकांबरोबर मी चर्चा केली आणि सभा सुरु झाल्यापासून सकाळी ११.०० वाजेपासून ते २.०० वाजेपर्यंत इथल्या लोकांना मदत मिळाली नाही. या शहरात पावसाचे पाणी आले आणि त्याबाबत सर्व सन्मा. सदस्यांनी भावना व्यक्त केलेल्या आहेत आणि या परिसरातले सर्कल भोईर साहेब यांच्याशी बोललो तेव्हा त्यांनी सांगितले की, ज्यांच्या घरात ५ ते ६ फुट पाणी भरलेले आहे अशाच लोकांना मदत देण्यांत येईल. परंतु, या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी प्रॉब्लेम झाले तिथे कुठेच हा निकष लावला गेला असे मला दिसत नाही. मिरा भाईंदरला फक्त हा निकष लावला गेला आणि संदर्भातच आत्ताच ठाणे जिल्ह्याचे मा. कलेक्टर नंदकुमार जंत्रीसाहेब यांच्याशी मी बोललो आणि त्यांची वेळ घेतली. उद्या शनिवारची सुट्टी आहे. परवा रविवारची सुट्टी आहे आणि सोमवार १५ ऑगस्ट आणि कदाचित येथेच सरकारची मंगळवारपर्यंत पॉलिसी बदलली तर आपल्याकडे ८५४१ घरांचे सर्व्हे झालेले आहेत. त्याच्यापैकी कोणालाही मदत मिळणार नाही. मी त्यांना सांगितले की, सभागृहात आमच्या सन्मा. नगरसेवकांनी या विषयावरती अतिशय गंभीर अशी मते मांडलेली आहेत. तरी त्यांना वेळ द्यावी आणि त्यांनी वेळ दिलेली आहे. जर सदस्यांची मान्यता असेल तर आजची सभा आपण येथेच स्थगित करु आणि आजचे सदन ठरवेल की, मंगळवारी तसेच पुढच्या हप्त्यामध्ये बुधवारी आपण जो दिवस सांगाल त्या दिवशी आपण ही सभा पुढे कंटीन्यु करु. पण मात्र आज सर्व नगरसेवकांनी जायचे आहे. कारण शहरामध्ये रोज लोक आपल्याला विचारतात की, आम्हाला मदत कधी मिळणार आहे आणि आपण रोज थातुर-मातूर उत्तरे देतो. बहुतेक उद्या. काल मला आमच्या येथे नविन तहसिलदाराची नियुक्ती झाली. झळकेराव साहेबांना मी सांगितले तर त्यांनी असे सांगितले की, तुमच्याकडे उद्या ११.०० वाजता मदत वितरणाला सुरुवात होईल. आता नुकतेच कलेक्टर साहेबांनी सांगितले की,

आमच्याकडून कोणावरही अन्याय होणार नाही आणि मग हे काय चालले आहे? सात दिवसापासून सगळीकडे मदत ही वाटली जात आहे आणि या ठिकाणी मिरा भाईंदरमध्ये वाटली जात नाही. म्हणून सभागृहाला विनंती करतो की आपण आजची सभा स्थगित केली आणि आपण सांगू की, ही सभा मंगळवारी घ्यायची की, बुधवारी. परंतु, सभा स्थगित झाल्यानंतर.........

**रोहिदास पाटील :-**

आपण रुलिंग देत आहेत की, त्याच्यावर मतदान घ्यायचे.

**मा. उपमहापौर :-**

एकमताने केली तरी काही हरकत नाही आणि सर्वांनी ठाण्याला जायचे आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. आयुक्त आणि उपमहापौर आपल्याकडे आजच्या अजेंड्यावरती बरेचसे विषय आहेत. या विषयांपैकी काही विषय अतिशय महत्त्वाचे आणि अर्जन्सीचे आहेत. परवा मा. महापौर मॅडम यांनी जी सभा बोलाविलेली होती तो मा. महापौर विशेष निधी स्थापन करणेसाठी. आपल्याला मदत दुसऱ्याकडून मिळत नाही म्हणून आपण सभा स्थगित करत आहोत आणि आपण स्वतः लोकांना मदत करु शकू या अर्थाने एक विषय या पटलावर आणलेला आहे. मा. महापौर विशेष निधी स्थापन करण्याचा तरी मला वाटते हे दोन विषय संपवा आणि सभा तहकुब करायला हरकत नसावी. हे दोन विषयच फार महत्त्वाचे आहेत.

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, इतिवृत्त हा विषय वाचतांनाच अर्धा पाऊण तास जाईल आणि मा. कलेक्टर साहेब हे भेटणार नाहीत.

**मा. उपमहापौर :-**

आपण तशी मा. कलेक्टर साहेबांची वेळ घेतलेली आहे आणि आपण बुधवारची मिटींग पुन्हा तहकुब सभा लगेच कंन्टीन्यु करु.

**प्रफुल्ल पाटील :-**

मघाशी काय झाले की, आम्हीपण वाट पहात होतो की, लंच टाईम होऊन जवळ जवळ अडीच तास व्हायला आलेत. आम्हांला असे वाटले की, तुम्हांला जायचे ठरते की नाही ठरते आणि आतासुद्धा वेळ ही निघून गेलेली आहे. ठिक आहे. मा. कलेक्टर साहेबांची आपण वेळ घेतलेली असेल. त्याबद्दल काही प्रश्न नाही. पण एक दोन विषय हे फार महत्त्वाचे आहेत. तर मला असे वाटते की, आपण त्यांची मदत घेतो आहेत तर आपला स्वतःचा सुद्धा मदत निधी लवकर तयार केला तर आपण जास्तीत जास्त लोकांना मदत करु शकू. हा वेळ निघून गेला की, मग पुन्हा ही सभा लावणे तरी हे दोन विषय घेऊन मग काय ते करावे. पुढचे इतिवृत्तांत हा विषय जरा मागे घ्या.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, आपल्याकडे नवनियुक्त मा. आयुक्त साहेब आलेले आहेत. म्हणून ती सभा चालू केली आणि त्यामुळेच जरासा आपल्याला वेळ झाला. परंतु, मी तुमच्यासमोरच फोन केला, मा. कलेक्टर साहेबांना आणि त्यांच्याकडून तशी आपण वेळ घेतलेली आहे. विषयपटलावरचे विषय हे सगळेच महत्त्वाचे आहेत आणि आपले तिथे उपस्थित असणेसुद्धा अतिशय महत्त्वाचे आहे. कारण सर्व सन्मा. सदस्यांनी जर एकमुखी तिथे जर सांगितले, सगळेजण आपआपल्या परिने तिथे जाऊन सांगितलेले आहे. परंतु, आपल्याकडे अजुनही मदतीचा कुठलाही ओघ हा नाही. तरी आपले सगळेजण एकदाच गेलो तर आपल्याला नक्कीच काहीतरी निर्णय मिळेल अशी आपल्याला आशा आहे आणि मा. महापौर मॅडम यांनी पुढची मिटींग ही कधी ठेवावी याबाबत तसे रुलिंग द्यावे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, मॅडम सभा तहकुब करण्यापुर्वी आपण जे पुरग्रस्तामध्ये जी माणसे मृत्युमूखी पडलेली आहेत त्यांना श्रद्धांजली वाहण्यांत यावी तरी दोन मिनीटे उभे राहून श्रद्धांजली वाहण्यांत यावी.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आज या ठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. आयुक्त पदी विराजमान झालेले श्री. गायकवाड साहेब हे या ठिकाणी आलेले आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. महापौर मा. सावळे मॅडम, तसेच उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती साहेब आणि सर्व सन्मा. सदस्य. मा. गायकवाड साहेब या ठिकाणी आयुक्त पदी हजर झाल्यानंतर प्रशासनाच्या वतीने आपल्या सर्वांच्या वतीने मी त्यांचे हार्दिक स्वागत करतो आणि जास्तीत जास्त जसे सन्मा. सदस्य म्हात्रे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही चांगल्या प्रशासनातर्फे चांगल्या प्रकारे सहकार्य देण्याचा आम्ही प्रयत्न करु आणि त्यांची कारकिर्द ही निश्चितपणे यशस्वी होईल अशी खात्री मी तुम्हांला देतो आहोत. श्री. गायकवाड साहेबांचा परिचय हा आपल्या सर्वांना आहे. श्री. गायकवाड साहेब हे काही नवीन नाहीत. मी सांगण्याच्या उद्देशाने एक योगायोगाचा प्रश्न सांगतो की, या नगरविकास खात्यामध्ये आल्यापासून प्रत्येक वेळी मी त्यांच्याकडून चार्ज घेतलेला आहे. ज्या ज्या ठिकाणी मी

गेलो ज्यावेळी माझी पहिली नियुक्ती त्यावेळी मी गायकवाड साहेबांकडूनच चार्ज घेतला. पहिल्यांदा मी इगतपुरीला आलो व दुसऱ्यांदा मी खोपोलीला मा. गायकवाड साहेबांकडून चार्ज घेतला. त्यानंतर विरारला गेलो. त्यावेळीसुद्धा मा. गायकवाड साहेबांकडून चार्ज घेतला. नालासोपारा, पालघर या प्रत्येक ठिकाणी गेलो आणि आज योगायोग सुद्धा आहे आणि साहेबांच्या कामाच्या पद्धतीबद्दल मला त्याचा चांगला अनुभव आहे. तसा माझा इतकाच आपल्यालासुद्धा अनुभव आहे आणि निश्चितपणे मी खात्री देतो की, मिरा भाईंदरचे जे प्रश्न आहेत ते निश्चितपणे चांगल्या प्रकारे हाताळले जातील याची मी ग्वाही देतो आणि प्रशासनाच्या वतीने आणि सर्वांच्या वतीने मी त्यांचे स्वागत करतो आणि त्यांच्याकडून सहकार्य देण्याबाबतचे आश्वासन देतो. जयहिंद!

(मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. विरोधी पक्ष नेता, मा. सभागृह नेता तसेच प्रशासनातर्फे मा. उपायुक्त श्री. अशोककुमार रणखांब सो. आणि सर्व पक्षाचे सन्मा. सदस्य/सदस्या यांनी नवीन आलेले आयुक्त श्री. सुदामराव गायकवाड ह्यांचे स्वागत केले.)

**मा. महापौर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त पदाची कमान सांभाळणारे आयुक्त श्री. सुदाम गायकवाड साहेब यांचे अभिनंदन. या शहराच्या विकासासाठी या विकासात त्यांचे आपल्याला फार मोठे योगदान व सहकार्य मिळेल याची मी त्यांच्याकडून पूर्णपणे अपेक्षा करते आणि त्यांना एकदा पुन्हा शुभेच्छा देते. धन्यवाद! व आजची सभा येथेच तहकुब झाल्याचे जाहीर करते व तहकुब सभा ही बुधवारी घेतली जाईल.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- दुपारी ०३.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**